राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

# निवडणूक निर्णय अधिकारी व इतर अधिकारी यांच्यासाठी सर्वसाधारण सूचना व आदेशांचा सारसंग्रह

## (नगरपरिषद / नगरपंचायत निवडणुकांकरीता)

मे, २०२६

पहिला मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

अनुक्रमणिका

| प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | **प्रस्तावना** | १ |
| २ | मतदार यादी व मतदान केंद्र निश्चिती | ५ |
| ३ | नामनिर्देशन पत्राबाबतच्या तरतुदी | १२ |
| ४ | छाननी | २६ |
| ५ | अपील | ३३ |
| ६ | उमेदवारी मागे घेणे | ३४ |
| ७ | चिन्ह वाटप-सर्वसाधारण सूचना | ३६ |
| ८ | मतदान कर्मचारी वृंद | ४२ |
| ९ | उमेदवार व विविध प्रतिनिधी यांना ओळखपत्र देण्याची कार्यपध्दती | ५२ |
| १० | आचारसंहिता-सर्वसाधारण सूचना | ५३ |
| ११ | अनामत रक्कम जप्त करणे | ६४ |
| १२ | राज्य निवडणूक आयोगाकडे माहिती पाठविण्याचे विविध नमुने | ६५ |
| | इतर महत्त्वाचे आदेश व सूचना | |
| १३ | मतदार यादी, मतदान केंद्र निश्चिती, सर्व्हिस वोटर्स व मतदारांच्या ओळखीचे पुरावे इ. संदर्भातील आदेश व सूचना | |
| १४ | नामनिर्देशन पत्राबाबतच्या तरतुदी व मतपत्रिकेचा नमूना इ.संदर्भातील आदेश व सूचना | |
| १५ | राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्ह वाटप संदर्भातील आदेश व सूचना | |
| १६ | आचारसंहिता संदर्भातील आदेश व सूचना | |
| १७ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र संदर्भातील आदेश व सूचना | |
| १८ | निवडणुकीसाठी लागणरे नमुने व इतर साहित्य | |
| १९ | राज्य निवडणूक आयोगाकडे माहिती पाठविण्याचे विविध नमुने | |
| २० | इतर अनंषंगिक महत्वाचे आदेश व सूचना | |

## प्रकरण – १

## प्रस्तावना

**१) निवडणूक विषयक कायदेशीर तरतुदी व अंमलबजावणी :**

भारतीय संविधानाच्या **अनुच्छेद २४३ झेडए** अन्वये नगरपालिकांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण हे राज्य निवडणूक आयोगाकडे सोपविण्यात आले असून, **महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ आणि त्या अंतर्गत असणारे, नगरपालिका/ नगरपंचायती निवडणूक नियम, १९६६** यामधील तरतुदीनुसार निवडणुकांबाबत कार्यवाही केली जाते.

राज्य निवडणूक आयोगाकडील **आदेश क्र.रानिआ- २०१६/ अहाका / प्र.क्र.१०/ सं.क्र., दि.०४/१०/२०१६** रोजीच्या आदेशानुसार निवडणुकीशी निगडित सर्व अधिकाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांमध्ये अनपेक्षित परिस्थिती हाताळतेवेळी खालील अग्रक्रमाप्रमाणे असणाऱ्या तरतुदींचा विचार करावा.

- संविधानातील तरतुदी
- संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाकरिता अधिनियम व नियमातील तरतुदी,
- मा. सर्वोच्च / उच्च न्यायालयाचे निर्णय
- राज्य निवडणूक आयोगाने पारित केलेले आदेश, सूचना, इ.

उपरोक्त तरतुदींनुसार देखील एखादी परिस्थिती हाताळणे शक्य नसल्यास आयोगाकडे अभिप्रायासह अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तरी या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करावा.

**२) निवडणूक निर्णय अधिकारी यांची भूमिका / कार्यपध्दती :**

संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीत व रितसरपणे पार पाडणे हे मुख्यत्वे करुन निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहे. लहानशी चूक किंवा चुकीची कार्यपध्दती अथवा अपूर्ण माहिती / गैरसमजूत / चुकीचा अन्वयार्थ यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रिया रद्दबादल होऊ शकते याची नोंद घ्यावी.

ही मार्गदर्शक पुस्तिका केवळ माहितीकरीता व मार्गदर्शनाकरीता तयार करण्यात आली असून ती सर्वसमावेशक किंवा अधिनियम व नियमाला पर्याय नाही, हे लक्षात घ्यावे व त्यामुळे आवश्यकतेनुसार अधिनियम व नियमातील तरतुदी मुळात वाचणे व संदर्भासाठी तपासणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे राज्य निवडणूक आयोगाचे विविध आदेश, सूचना, परिपत्रके इत्यादी देखील संदर्भासाठी पहाणे आवश्यक आहे, त्यामुळे सदर पुस्तकात प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी त्यांचा समावेश केलेला आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीमध्ये राज्य निवडणूक आयोगाकडून त्यात काही बदल केल्यास त्याच्या प्रती आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध होतील. तरी, त्याचे वेळोवेळी अवलोकन

करणे आवश्यक आहे. तसेच निवडणुकीच्या कामाकरीता विहित केलेले नमुने, प्रपत्रे इ. आवश्यकतेनुसार पुरेशा प्रमाणात तयार करुन ठेवणे आवश्यक आहे.

**३) कर्तव्याची रुपरेषा :**

- निवडणुकीची व्यवस्था आणि कामाची आखणी निवडणूक कार्यक्रमास सुरुवात होण्यापूर्वीच करणे जसे आवश्यक कर्मचारीवृंद अधिग्रहित करणे, मतदान केंद्राची पाहणी करणे, पोलिसांच्या सहाय्याने संवेदनशील अतिसंवेदनशील मतदान केंद्र निश्चिती करणे, कमजोर सामाजिक घटकांचा (Vulnerable Mapping) शोध घेणे, मतमोजणी आराखडा तयार करणे, आयोगास सादर करावयाच्या अहवालांच्या नमुन्यांचे, तसेच आवश्यक नोटीसा, नमुने संगणकीकृत करून ठेवणे इ.
- नगरपालिकेच्या सर्व प्रभागांची आवश्यक ती सर्व माहिती असणारी तसेच निवडणुकीची तयारी (वाहतूक आराखडा, मतदान साहित्य, कर्मचारीवृंद इ.) दर्शविणारी माहिती पुस्तिका निवडणूक निरीक्षकांसाठी तयार ठेवणे
- पुरेशा प्रमाणात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व इतर साहित्य उपलब्ध करुन घेणे.
- निवडणुकीची अधिसूचना व जाहीर नोटीस देणे, नामनिर्देशनपत्रे व अनामत रक्कम स्वीकारणे, उमेदवाराकडून शपथपत्र /घोषणापत्र / हमीपत्र स्वीकारणे.
- उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्रातील व शपथपत्रातील माहिती प्रसिध्द करणे.
- नामनिर्देशनपत्रांची छाननी करणे, नामनिर्देशनपत्र नाकारण्याची कारणे संक्षिप्तपणे नमूद करणे.
- उमेदवारी मागे घेण्याच्या नोटीसांची पोहोच पावती देणे.
- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चिन्ह वाटप करणे.
- नामनिर्देशनांची नोटीस, वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे व प्रसिध्द करणे.
- मतदान केंद्रनिहाय मतदार यादी तयार करणे.
- मतपत्रिकांची ( पोस्टल बॅलट पेपर व मतपत्रिका इत्यादीसह ) संख्या निश्चित करणे व छपाई व पुरवठ्याची /वितरणाची व्यवस्था करणे.
- स्वच्छ, निर्भय व नि:पक्षपाती रितसर निवडणुकांकरीता उमेदवार व राजकीय पक्षांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे, नियमांतील तरतुदी वा अन्य सूचना देवून अद्ययावत ठेवणे.
- निवडणुका व्यवस्थित पार पाडण्याकरीता कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती यांचा आढावा घेणे व आचारसंहिता पालन /अंमलबजावणी याकरीता आवश्यक उपाययोजना करणे.
- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे वापरासाठी मतदानाच्या किमान एक आठवडा ( मतपत्रिका तयार झालेबरोबर लगेच ) अगोदर ईव्हीएम तयार ( Set & Seal ) करणे.

- मतदान यंत्र तयार करण्यापूर्वी ( Set & Seal ) त्याची सूचना संबंधित उमेदवार व राजकीय पक्ष यांना देऊन त्यांना उपस्थित राहण्यास कळवावे.
- राज्य निवडणूक आयोगाने दि.२७.११.२०२५ रोजी सर्व बॅलेट युनिटवरील END बटन पांढऱ्या मास्कींग टॅबने बंद ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार ईव्हीएम तयार ( Set & Seal ) करताना कार्यवाही करावी.
- मतदान व मतमोजणी प्रक्रियेमध्ये नेमण्यात येणारे सर्व अधिकारी/कर्मचारी यांना मतदान यंत्रांच्या कार्यपध्दतीची नीट माहिती करुन देणे व त्यांना आत्मविश्वास जोपर्यंत येत नाही तोपर्यंत त्याचे प्रशिक्षण घेणे.
- मतदान पथके, मतपत्रिका, ईव्हीएम, मतदानाचे इतर साहित्य इ. मतदान केंद्रावर पोहचविणे व परत आणण्यासाठी वाहतूक आराखडा तयार करणे व त्याप्रमाणे व्यवस्था करणे.
- मतदानानंतर ईव्हीएम सुरक्षितपणे ठेवण्याची व्यवस्था करणे.
- मतमोजणी कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे.
- निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे मतमोजणी ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व वेळेस करणे.
- निकाल जाहीर करणे.
- मतमोजणीचा निकाल जाहीर झाल्यानंतर / ईव्हीएम व सर्व मतदान साहित्य सांविधानिक व असांविधानिक लिफाफे इत्यादींचे जतन करणे व मतदान यंत्रांच्या मेमरी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कोषागारात किंवा उपकोषागारात ठेवणे.
- परिणामकारक नियंत्रण.
- सर्वसाधारण पर्यवेक्षण.

**४) जिल्हाधिकारी हे निवडणूक अधिकारी असून यांनी करावयाची काही महत्वपूर्ण व्यवस्था.**

- निवडणुकांच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व विभागांचे सहाय्य घेणे.
- आवश्यकतेनुसार विभागीय आयुक्तांकडून, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी उपलब्ध करून घेणे व प्रत्येक मतदान केंद्राकरीता केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी तसेच इतर कर्मचारी उपलब्ध करून देणे.
- मतदान कर्मचाऱ्यांना ( राखीव कर्मचाऱ्यांसह ) सखोल व पूर्ण प्रशिक्षण देणे .
- सांविधानिक तरतुदी, कायद्यातील, नियमातील तरतुदी, आयोगाच्या विशेष सूचना, आदेश व परिपत्रके निवडणूक निर्णय अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे.
- महत्वाच्या बाबींची तपासणी सूची तयार करणे व ती देणे.

- मतपत्रिका/ मतदान यंत्रे व कार्यपध्दती याबाबत सर्वसाधारण जनता, राजकीय पक्ष, उमेदवार व जनसंपर्क माध्यमे यांना अवगत करणे.
- आवश्यक साहित्य जसे मतपत्रिका, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे, न पुसणारी शाई, सिलिंग साहित्य, निवडणूक साहित्य, विभेदक चिन्ह, पितळी सील इ. उपलब्ध करुन देणे .
- मतपत्रिकांची तसेच निवडणूक कर्मचारी व पोलीस मतदारांसाठी टपाली मतपत्रिका छपाईची व्यवस्था करणे.
- निवडणुका पूर्ण झाल्यानंतर ईव्हीएम व निवडणूक कागदपत्रे व साहित्य सुरक्षित ठेवणेसाठी गोदामांची व्यवस्था करणे.

या सर्व प्रकारच्या कार्यवाहीकरीता व निवडणुका सुव्यस्थितपणे पार पाडण्याकरीता निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याशी नियमित संपर्कात रहाणे आवश्यक आहे.

# प्रकरण – २

## मतदार यादी व मतदान केंद्र निश्चिती

**राज्य निवडणूक आयोगाने दि. १६ जुलै, २०२५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने एकत्रित आदेश निर्गमित केले आहेत. तसेच मतदार यादीतील दुबार नावांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत दि. २९ ऑक्टोबर, २०२५ रोजी सविस्तर कार्यपध्दती विहित केली आहे. त्यानुसार नगपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांकरीता मतदार यादी तयार करण्याची कार्यवाही करावयाची आहे.**

**१. विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरणे-**

राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या क्षेत्राकरीता अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी नगरपालिकेच्या प्रभागांमध्ये विभागून ती निवडणुकीसाठी छापून घेणे व प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अधिप्रमाणित करणे आवश्यक आहे. असे करताना संबंधित क्षेत्राची विधानसभेची मतदार यादी जशी असेल तशी संबंधित प्रभागांमध्ये विभागावयाची आहे. त्यामध्ये कोणतीही नावे समाविष्ट करणे, कमी करणे किंवा त्यामध्ये सुधारणा करणे इत्यादींची अनुमती देण्यात आलेली नाही. मतदार यादी विभागताना प्रभागाच्या हद्दीवर राहणाऱ्या मतदारांच्या संदर्भात विशेष दक्षता घेणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यकतेनुसार स्थळ निरिक्षण करणे आवश्यक आहे. जेणेकरुन निवडणूक प्रभागाच्या हद्दीतील मतदारांची नावे अन्य निवडणूक प्रभागाच्या मतदार यादीत समाविष्ट होणार नाहीत. यासोबतच विधानसभा मतदार यादीमध्ये नमूद असलेले कोणतेही मतदार वगळले जाणार नाहीत तसेच यथास्थिती विधानसभा मतदार संघातील नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या संबंधित निवडणूक प्रभागाच्या क्षेत्राबाहेरील मतदार चुकीने मतदार यादीत समाविष्ट होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**२. मतदार यादीचे विभाजन करताना घ्यावयाची दक्षता –**

नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या निवडणुकीकरीता मतदार यादी प्रभागनिहाय विभाजित करताना विधानसभेच्या मतदार यादीतील सेक्शन ॲड्रेसचा वापर केला जातो. मात्र बऱ्याचदा सेक्शन ॲड्रेस हे मोघम, अपूर्ण किंवा चुकीचे असल्यास, एखादी इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था ही सेक्शन ॲड्रेसनुसार ज्या प्रभागात समाविष्ट दिसते, प्रत्यक्षात मात्र सदर इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था त्या प्रभागात नसून इतर प्रभागाच्या भौगोलिक हद्दीत असते. त्यामुळे सदर इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेतील रहिवाशी मतदारांची नावे ही मूळ प्रभागाऐवजी अन्य प्रभागात समाविष्ट होतात. सदर परिस्थिती ही विशेषत: लगतच्या

प्रभागांच्या सीमांवर आढळते. अशावेळी केवळ सेक्शन ॲड्रेस लक्षात घेता, सदर इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेतील मतदारांची नावे ही ती इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था प्रत्यक्षात ज्या प्रभागात स्थित आहे, त्याच प्रभागात समाविष्ट करणेबाबत काळजी घेण्यात यावी.

**३. मतदार यादी अधिप्रमाणित करणे व त्याची अभिरक्षा -**

नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या निवडणुकांकरीता मतदार यादीचे विभाजन करुन ती अधिप्रमाणित करण्यासाठी मुख्याधिकारी दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत करावे. तसेच संबंधित मतदार यादीची अभिरक्षा करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांनी मुख्याधिकारी दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास सोपवावी.

**४. प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे-(आयोगाचे आदेश दि.१६/०७/२०२५)**

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार यादी कार्यक्रमानुसार नेमून दिलेल्या दिनांकास प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करुन त्यावर हरकती व सूचना मागविण्यात याव्यात. अधिकाअधिक मतदारांना मतदार यादीची प्रसिध्दीची माहिती होण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिल्यानूसार तसेच उपलब्ध अन्य मार्गाने मतदार यादी प्रसिध्द करावी. आवश्यक असल्यास मतदार जागृती मोहिम राबविण्यात यावी.

**५. दुबार नावांबाबत -(आयोगाचे आदेश दि. १६/०७/२०२५ व दि. २९/१०/२०२५) -**

विधानसभेच्या मतदार यादीतून दुबार नावे वगळण्याची कार्यवाही संबंधित मतदार नोंदणी अधिकारी मार्फत करण्यात येते. तरी देखील अपवादात्मक परिस्थितीत प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करताना, जर काही मतदारांची नावे एकापेक्षा जास्त वेळा आली असल्याचे कळल्यास व प्राथमिक चौकशी नंतर ती दुबार नावे एकाच व्यक्तीची असल्याचे निदर्शनास आल्यास तो मतदार एकच आहे याची खात्री करुन घ्यावी. जर त्या मतदाराचे नाव एकापेक्षा जास्त प्रभागात आले असल्यास अशा मतदारांची नावांची यादी सूचना फलकावर/वेबसाईटवर प्रसिध्द करावी व त्यांना ते कोणत्या प्रभागात मतदान करणार आहेत याबाबत लेखी अर्ज करण्याचे आवाहन करावे. जे मतदार सदर आवाहनाला प्रतिसाद देऊन ते कोणत्या प्रभागात मतदान करणार आहेत हे कळवतील, त्यानुसार अंतिम मतदार यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादीमध्ये नोंद घ्यावी. मात्र सदर आवाहनास अशा मतदारांनी प्रतिसाद न दिल्यास सर्व मतदार यादीमधील त्यांचे नांवासमोर "दुबार नाव" अशी नोंद करावी व असे मतदार मतदानासाठी आल्यास मतदान केंद्राध्यक्षांमार्फत त्यांच्या ओळखपत्रावरुन

त्यांच्या खरेपणाविषयी खातरजमा करावी. अशी खात्री पटल्यानंतरच त्यांना मतदान करु द्यावे.

राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २९ ऑक्टोबर, २०२५ च्या आदेशान्वये मतदार यादीतील संभाव्य दुबार नावांबाबत करावयाची उपाययोजना नमूद केली आहे. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने उपलब्ध करुन दिलेल्या मतदार यादीच्या संगणक प्रणालीमधील दुबार रिपोर्ट मधून संभाव्य दुबार नावांची यादी मिळू शकते. सदर यादीची तपासणी करुन ती व्यक्ती एकच आहे किंवा कसे याबाबत माहिती मिळवण्यात यावी. एकापेक्षा जास्त नाव असलेला मतदार एकच व्यक्ती असल्यास त्याच्याकडून सदर आदेशाच्या परिशिष्ट-एक मधील अर्ज भरून घ्यावा. जर अशा मतदारांकडून प्रतिसाद न आल्यास व जर अशी व्यक्ती मतदानास आल्यास त्या व्यक्तीकडून सदर आदेशाच्या परिशिष्ट-दोन मधील हमीपत्र घेऊन त्याला मतदान करु द्यावे.

## ६. मतदार यादीवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नोंदविणे -

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार विहित केलेल्या कालावधीमध्ये खालील नमूद बाबींच्या अनुषंगाने हरकती व सूचना नोंदविता येतील. यामध्ये (i) स्वत: मतदाराने केलेला अर्ज आणि (ii) इतर मतदाराने एक किंवा अनेक विशिष्ट मतदाराबाबत हरकती/आक्षेप/सूचना प्राप्त होण्याची शक्यता आहे.

नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येत असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीत खालील नमूद हरकती व सूचना प्राप्त होतील:-

(अ) १) मतदारांची नावे असूनही नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या कोणत्याही निवडणूक प्रभागाच्या मतदार यादीमध्ये त्यांची नावे समाविष्ट करण्यात आली नसल्यास

किंवा

२) चुकीच्या निवडणूक प्रभागात नावे समाविष्ट करण्यात आली असल्यास,

अशा मतदारांची नावे अनुक्रमे मतदार यादीत व योग्य निवडणूक प्रभागात समाविष्ट करणे, अशी परिस्थिती असल्यास मतदाराने स्वत: विहित मुदतीत, वास्तव्याच्या पुराव्यासह **नमुना "अ"** मध्ये अर्ज दाखल करणे आवश्यक राहील.

एकाच सहकारी गृहनिर्माण संस्थेत राहणाऱ्या एकापेक्षा अधिक मतदारांचे नमुना "अ" मधील अर्ज त्या संस्थेच्या अध्यक्ष/सचिव यांच्यामार्फत त्या, संस्थेच्या लेटर हेडवर संबंधित सचिव किंवा अध्यक्षाच्या स्वाक्षरीने एकत्रितपणे सादर करता येतील. मात्र कोणत्याही परिस्थितीत एक गठ्ठा पध्दतीने किंवा

एकत्रित यादीच्या स्वरुपात हरकती दाखल करता येणार नाहीत व असे अर्ज विचारात घेणे आवश्यक असणार नाहीत.

(आ) नगरपरिषदा/ नगरपंचायती क्षेत्रातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे नसूनही नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे समाविष्ट करण्यात आली असल्यास, अशा मतदारांची नावे वगळावयाची असल्यास, विहित मुदतीत तक्रारदाराने नमूना "ब" मध्ये अर्ज सादर करणे आवश्यक आहे. मात्र सदर तक्रारदार हा संबंधित निवडणूक प्रभागातील मतदार असावा.

(इ) लेखनिकांच्या चुका (नाव, लिंग, चुकीचे टंकलेखन इ.) याबाबत मतदाराने विहित नमुन्यातील (नमूना "अ") अर्जासोबत राज्य निवडणूक आयोगाने मतदाराची ओळख पटविण्यासाठी विहित केलेल्या व मतदाराचे स्वत:चे छायाचित्र असलेल्या ओळखपत्रांपैकी कोणतेही एक ओळखपत्र (ज्यामध्ये मतदाराचे नाव योग्यरित्या नमूद केलेले आहे.) सादर करणे आवश्यक असेल.

## ७. प्रारुप मतदार यादीसंदर्भात आलेल्या हरकती व सूचनांवर निर्णय घेणे -

७.१ मतदाराने स्वत: अर्ज करुन वरील परिच्छेद ६ (अ) नुसार मतदार यादीत दुरुस्ती करण्याची विनंती केल्यास, सदर अर्जाबाबत आवश्यक ती चौकशी व स्थळ पाहणी करुन निर्णय घेण्यात यावा .

७.२ मात्र कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीने एक किंवा अनेक मतदारांबाबत नमुना "ब " मध्ये हरकत/ आक्षेप सादर केल्यास, ज्या मतदाराबाबत हरकत/आक्षेप घेण्यात आले आहे त्या मतदाराला नोटीस काढून त्याचे म्हणणे मांडण्यासाठी वाजवी संधी दिल्याशिवाय हरकत/ आक्षेप अर्जावर निर्णय घेण्यात येऊ नये.

७.३ आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस ज्या मतदाराचे अथवा मतदारांची नावे नगरपरिषदा/ नगरपंचायती क्षेत्राशी संबंधित विधानसभा मतदार यादीत नसतील, अशा मतदारांची नावे नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या मतदार यादीत समाविष्ट करता येणार नाहीत.

## ८. मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे :

८.१ राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास मतदार याद्या अधिप्रमाणित करण्यात याव्यात व त्याबद्दलची सूचनाही प्रसिध्द करण्यात यावी.

८.२ अंतिम मतदार यादी अधिप्रमाणित करीत असताना मतदार यादीच्या मुखपृष्ठावर नगरपरिषदा/ नगरपंचायतीचे नाव, प्रभाग क्रमांक व नाव, मतदार यादी प्रसिद्ध केल्याचा दिनांक, त्या यादीमध्ये समाविष्ट यादी भागातील विभागाचा (section) तपशिल, मतदार यादीचा गोषवारा (मतदार क्रमांक, स्त्री-पुरूष-इतर व एकूण मतदार) छापावा. यादीच्या प्रत्येक पानावर पान क्रमांक, नगरपरिषद/ नगरपंचायत कार्यालय यांचा गोल शिक्का व ती तयार करावयास प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची सही असावी. शेवटच्या पानावरील प्रमाणपत्रावर अधिप्रमाणित करणाऱ्या अधिकाऱ्याची सही व शिक्का असावा.

i) मतदार यादीच्या वरच्या बाजूस आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकाचा (Cut Off Date) म्हणजेच विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्याच्या दिनांकाचा स्पष्ट उल्लेख असावा.

ii) मतदार यादीच्या प्रत्येक पानावर यथास्थिती प्रारूप/ अंतिम मतदार यादी असे स्पष्ट नमूद करण्यात यावे अथवा शिक्का मारावा.

८.३ नगरपरिषद/ नगरपंचायतीची अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर कोणतेही अर्ज/आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच अंतिम मतदार यादीत साधारणत: कोणत्याही कारणास्तव दुरुस्ती करता येणार नाही.

## ९. अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर त्यात दुरुस्ती करणे -

अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर त्यात फक्त पुढीलप्रमाणे दुरुस्त्या करता येतील:- आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस ज्या मतदारांची नावे संबंधित निवडणूक प्रभागाच्या मतदार यादीत असून देखील ती नावे निवडणूक प्रभागाच्या मतदार यादीत छापावयाचे राहून गेल्यास किंवा ज्या निवडणूक प्रभागाच्या मतदार यादीत असणे आवश्यक आहे, त्याऐवजी दुसऱ्याच निवडणूक प्रभागाच्या मतदार यादीत चुकीने छापण्यात आली असल्यास मतदार यादी तयार करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या निदर्शनास आल्यास संबंधित प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने त्याची खात्री करुन आणि सकारण आदेश पारित करुन त्याबाबत योग्य त्या दुरुस्त्या पुरवणी यादीच्या स्वरुपात कराव्यात. मात्र अशा दुरुस्त्या संबंधित नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या निवडणूकीसाठी नामनिर्देशनपत्रे भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत करता येतील. या पुरवणी यादीला व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी व ती संबंधित नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या वेबसाईटवर देखील प्रसिध्द करावी.

## १०. मतदार यादी पुरविणे -

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाची मतदार यादी वापरत असून ती प्रथम प्रभागनिहाय व त्यानंतर मतदान केंद्रनिहाय विभाजित करण्यात येते. अशी मतदार यादी विनामूल्य पुरविण्याची कायद्यात तरतूद नाही.

राज्य निवडणूक आयोगाच्या पत्र क्र.रानिआ/जिपपंस २०२५/प्र.क्र.३३/का.७, दि. ८ ऑक्टोबर, २०२५ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता मतदार यादीची प्रत ( प्रारुप व अंतिम मतदार यादी ) प्रतिपृष्ठ रु.२/- इतका दर आकारुन उपलब्ध करुन द्यावी. अशा प्रकारे मतदार यादीची प्रत देताना फोटो असलेली छापील मतदार यादी देण्यात यावी. मात्र वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या मतदार यादीत तसेच सॉफ्टकॉपीमध्ये (PDF फॉरमॅट) मतदार यादी देताना त्यात मतदारांचे फोटो असणार नाहीत.

**११.** राज्य निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांनुसार मतदार विभाजनाविपयक कार्यपद्धती अवलंबावी. जसे Computerised Voter list Bifurcation चे सॉफ्टवेअर वापरून मतदार यादीचे विभाजन करणे.

**१२.** मतदार यादीचे विभाजन करताना ते राज्य निवडणूक आयोगाने उपलब्ध करुन दिलेल्या संगणकीय प्रणालीचा वापर करुन करण्यात यावे. संगणक प्रणालीचा वापर करुन मतदार यादीचे विभाजन करताना खालील महत्वाचे टप्पे अनुसरण्यात यावेत.

i) संगणक प्रणालीमध्ये नगरपरिषद/ नगरपंचायत क्षेत्राशी संबंधित विधानसभा तसेच त्याचे यादी भाग निवडणे.

ii) विधानसभेची मतदार यादी राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवरुन डाऊनलोड करणे.

iii) वॉर्ड मास्टर तयार करणे.

iv) डाऊनलोड केलेल्या यादीचे विभाजन करुन कंट्रोल चार्ट तयार करणे.

v) विधानसभा क्रमांकनिहाय कंट्रोल चार्ट अपलोड करणे.

vi) प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रोसेस करणे.

vii) प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादीचे पिडीएफ डाऊनलोड करणे.

viii) अंतिम मतदार यादी तयार करण्यासाठी प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांपैकी ज्या हरकती मान्य करण्यात आल्या आहेत व त्यानुसार जे मतदार एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात समाविष्ट करणे आवश्यक आहे, त्यांचा ऑब्जेक्शन कंट्रोल चार्ट तयार करणे.

ix) प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रोसेस करणे.

x) प्रभाग निहाय अंतिम मतदार यादीचे पिडीएफ डाऊनलोड करणे.

xi) मतदान केंद्रांची माहिती मास्टर्समध्ये भरणे.

xii) मतदान केंद्रनिहाय कंट्रोल चार्ट तयार करणे.

xiii) मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रोसेस करणे.

xiv) मतदान केंद्रनिहाय मतदार यादीचे पिडीएफ डाऊनलोड करणे. या पिडीएफमध्ये मतदारांना द्यावयाच्या मतदार चिठ्ठयांचा देखील समावेश असेल.

**१३. मतदारांची ओळख पटविण्याकरीता ग्राह्य धरण्यात येणारे पुरावे :-**

मतदारांची ओळख पटविण्याकरीता ग्राह्य धरण्यात येणारे पुरावे कोणते राहतील याबाबत राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १४ जुलै, २०२५ रोजी सुधारीत आदेश काढले आहेत. सदर आदेशामध्ये नमूद केलेल्या पुराव्यांपैकी कोणताही पुरावा मतदाराची ओळख पटवण्याकरिता ग्राह्य धरण्यात यावेत. या सदंर्भात मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणादरम्यान योग्य त्या सुचना देण्यात याव्यात.

**१४. मतदान केंद्र निश्चिती :-**

राज्य निवडणूक आयोगाच्या दि.२६ जून, २०२५ आदेशान्वये खालील बाबींच्या अनुषंगाने सविस्तर आदेश दिले आहेत :-

१) **मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांची संख्या** - यामध्ये दि.२९ ऑगस्ट, २०२५ च्या आदेशान्वये सुधारणा केली आहे.

२) **मतदान केंद्राचे ठिकाण निवडणे**

३) **मतदान केंद्राच्या ठिकाणात अपवादात्मक परिस्थितीमध्ये बदल करणे**

४) **निवडणुकांकरीता कर्मचारी, जागा आणि वाहने अधिग्रहीत करणे -**

५) **मतदान केंद्रावर पुरवावयाच्या सोयी सुविधा**

६) **आदर्श मतदान केंद्राची निर्मिती**

७) **महिला मतदान केंद्र**

८) **मतदान केंद्राच्या बाहेर पक्षाचे मतदार सहाय्य केंद्र उभारणे**

९) **मतदान केंद्रात मोबाईल / कॉर्डलेस फोन / वायरलेस फोन वापरण्यास प्रतिबंध**

१०) **मतदान केंद्राच्या ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजना व सुरक्षा व्यवस्था इत्यादी**

११) **मतदान केंद्रांची यादी अंतिम करणे**

# प्रकरण – ३

## नामनिर्देशन पत्राबाबतच्या तरतुदी

**१. निवडणूक सूचना :**

१.१ महाराष्ट्र नगरपालिका नगरपंचायत निवडणूक नियम, १९६६ मधील नियम क्र. ४ मधील तरतुदी अन्वये राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास जिल्हाधिकारी हे सार्वत्रिक वा पोट निवडणूक कार्यक्रम जाहीर करतील.

१.२ उपरोक्त तरतुदीनुसार जिल्हाधिकारी राज्य निवडणूक आयोगाने दिलेला कार्यक्रम व नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचे ठिकाण व इतर तपशील विहित नमुन्यात प्रसिद्ध करतील ( प्रकरण- १८, नमुना- १ )

**२. नामनिर्देशन पत्र :**

२.१ राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या नामनिर्देशन पत्राच्या नमुन्यात उमेदवार आपले नामनिर्देशन पत्र दाखल करेल. राज्य निवडणूक आयोगाने क्र.रानिआ/नपा-२०१६/प्र.क्र.२८/का-६, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ च्या आदेशान्वये नामनिर्देशन पत्राचा नमूना विहित केला आहे, तो विचारात घेण्यात यावा. (सोबतचे अनुसूची-२ मधील शपथपत्र विचारात घेण्यात येऊ नये) राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १५ मार्च, २००४ च्या आदेशान्वये नामनिर्देशन पत्रासोबत गुन्हेगारी पार्श्वभूमी, शैक्षणिक अर्हता, स्थावर व जंगम मालमत्ता इत्यादी तपशील दर्शविणारे शपथपत्र सादर करण्याची तरतूद केली आहे. मात्र, उपरोक्त दि. १५ मार्च, २००४ च्या आदेशासोबतचे सहपत्र दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ च्या आदेशान्वये सुधारित केले आहेत, ते विचारात घेऊन अद्ययावत केलेला नामनिर्देशनपत्र व शपथपत्राचा नमूना विचारात घ्यावा.

२.२ राज्य निवडणूक आयोगाने नामनिर्देशनपत्र उमेदवारांना सहजरितीने भरता यावे यासाठी महाआयटीच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केले आहे. सर्व संभाव्य उमेदवारांनी सॉफ्टवेअरद्वारेच नामनिर्देशनपत्र व शपथपत्र भरणे आवश्यक आहे. या संगणक प्रणालीद्वारे सर्व उमेदवारांनी त्यांचे नामनिर्देशनपत्र व शपथपत्र भरावे. त्याची प्रिंट आऊट घेऊन त्यावर स्वाक्षरी करावी. असे स्वाक्षरी केलेले नामनिर्देशनपत्र व सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दृढकथन केलेले शपथपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने सादर करावयाचे आहे. असा भरलेला नामनिर्देशनपत्राचा व शपथपत्राचा नमुना नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. (यासाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रमातील सूचना पहाव्यात.)

नामनिर्देशन पत्रासोबत देण्यात येणारी **शपथपत्रे देखील संगणक प्रणालीवर भरण्यात यावीत व त्याचेही प्रिंट आउट्स साक्षांकीत करून** नामनिर्देशन पत्राच्या स्वाक्षरी

केलेल्या संगणकीय प्रिंट आऊटसोबत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करावे.

संगणक प्रणालीद्वारे नामनिर्देशन प्रक्रिया राबविण्याकरिता प्रथम वॉर्ड मास्टर व आरओ मास्टर भरणे आवश्यक आहे. सदर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय उमेदवारांना प्रभागातील आरक्षित जागा इत्यादी तपशिल दिसणार नाही. त्यामुळे ही माहिती नामनिर्देशनपत्र सुरु होण्यापूर्वी संगणक प्रणालीमध्ये अद्ययावत करणे आवश्यक आहे.

**मात्र जर राज्य निवडणूक आयोगाने पारंपारीक पध्दतीने (ऑफलाईन) नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली असल्यास त्यानुसार कार्यवाही करावी.**

**मे-जुन २०२६ मधील नगरपरिषद/ नगरपंचायत सार्वत्रिक/ पोट निवडणूक साठी नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे फक्त पारंपारिक पध्दतीने (ऑफलाईन) दाखल करावयाचे आहेत व त्यानुसार कार्यवाही करावी.**

**३ सूचक :**

३.१ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या निवडणूक नियम, १९६६ मधील नियम क्र. १२(३) नुसार उमेदवाराचे नामनिर्देशन करण्याकरिता सूचक / प्रस्तावक कोण राहू शकेल याबाबत तरतूदी आहेत. त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. जी व्यक्ती मतदार म्हणून अपात्र नसेल व ज्या प्रभागात उमेदवारास नामनिर्देशित करावयाचे आहे, अशा संबधित प्रभागाच्या मतदार यादीत ज्याचे नाव समाविष्ट केले आहे अशी कोणतीही व्यक्ती सूचक / प्रस्तावक म्हणून पात्र राहील. यासंदर्भातील सविस्तर महितीकरीता उपरोक्त तरतुदींचे संपूर्ण वाचन करावे.

३.२ राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यता प्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांच्याबाबतीत (राष्ट्रीय पक्ष व राज्यस्तरीय पक्ष) एक सूचक/ प्रस्तावक तसेच **नोंदणीकृत अमान्यता प्राप्त राजकीय पक्ष, अपक्ष व इतर पक्षांच्या अशा सर्व उमेदवारांच्याबाबतीत पाच सूचक/ प्रस्तावक राहील**. नोंदणीकृत मान्यताप्राप्त व अमान्यताप्राप्त पक्ष कोणते आहेत याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे दि.०५/०५/२०२५ व दि.०८/११/२०२५ रोजीचे आदेश पहावे.

**४ नामनिर्देशन पत्र दाखल करणे /वेळ / ठिकाण :**

४.१ उपरोक्त १.२ मध्ये नमूद केलेल्या नोटिशीत नमूद दिवशी, निश्चित केलेल्या वेळेत व जाहीर केलेल्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी नामनिर्देशन पत्र स्विकारतील.

४.२ नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या दालनात उमेदवारांची गर्दी होण्याची शक्यता असते व त्यामुळे विहित वेळेमध्ये, सर्व

कागदपत्रांसह परिपूर्ण नामनिर्देशन पत्र घेऊन दाखल होणाऱ्या सर्व उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे दाखल करून घेण्यास अडचण होऊ शकते. सबब, आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार शेवटच्या दिवशी दुपारी ठिक ३.०० वा (कार्यक्रमात नमूद वेळेस) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयाचे दरवाजे बंद करावेत. तत्पूर्वी १० मिनिटे पुकारा करून ठिक ३.०० वा (कार्यक्रमात नमूद वेळेस) दरवाजे बंद करत असल्याची ताकीद द्यावी व नंतर सर्व कागदपत्रांसह परिपूर्ण नामनिर्देशन पत्र घेऊन दालनात उपस्थित उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे विहित पद्धतीने स्विकारावीत. अशी सर्व नामनिर्देशन पत्रे विहित वेळेत प्राप्त झाल्याचे मानले जाईल. परंतु कोणत्याही उमेदवारास विहित वेळेनंतर बाहेरुन कागदपत्र आणून सादर करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

४.३ आयोगाचे निरीक्षक कार्यालयात उपस्थित असल्यास त्यांनी या सर्व कार्यपद्धतीचे निरीक्षण करावे व आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे.

४.४ नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या व छाननी तसेच चिन्ह वाटपाच्या सर्व प्रकियेचे डिजीटल कॅमेऱ्याने (तारीख व वेळ दर्शविणाऱ्या) छायाचित्रण करावे.

## ५ नामनिर्देशन पत्र सादर करतेवेळी उपस्थित राहू शकणाऱ्या व्यक्ती व गाड्यांची संख्या :

५.१ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात जास्तीत जास्त २ वाहनांना परवानगी देण्यात येईल. उमेदवार मिरवणुकीने येत असल्यास १०० मीटर अगोदर मिरवणूक थांबवावी, त्यासाठी योग्य तो पोलीस बंदोबस्त ठेवावा.

५.२ सदरचे नामनिर्देशन पत्र उमेदवार स्वतः किंवा सुचकामार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास सादर करतील. त्यावेळी त्यांचे सोबत जास्तीत जास्त २ व्यक्तींना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात प्रवेश मिळेल. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यानी अनावश्यक गर्दी रोखण्यासाठी पोलीस यंत्रणेच्या सहकार्याने, योग्य तो पोलीस बंदोबस्त ठेवावा.

## ६ नामनिर्देशन पत्रांची संख्या :

६.१ उमेदवार एकापेक्षा जास्त निवडणूक प्रभागात नामनिर्देशनपत्रे भरु शकतात.

६.२ एका निवडणूक प्रभागातील एका जागेसाठी एका उमेदवाराला जास्तीत जास्त चार नामनिर्देशनपत्रे भरता येतात.

६.३ एखाद्या उमेदवारास राजकीय पक्षातर्फे आणि अपक्ष अथवा इतर पक्षातर्फे उमेदवारी अर्ज दाखल करावयाचा असल्यास तो प्रत्येक पक्षासाठी किंवा अपक्ष म्हणून स्वतंत्र नामनिर्देशन पत्र भरुन दाखल करता येईल.

## ७ अनामत रक्कम :

नगरपरिषद/ नगरपंचायत निवडणुकांकरिता उमेदवाराने आपल्या नामनिर्देशन पत्रासोबत खालीलप्रमाणे अनामत रक्कम भरावयाची आहे.

| उमेदवाराचा प्रवर्ग | नगरपरिषदा / नगरपंचायती निवडणुकांकरीता अनामत रक्कम | | |
|---|---|---|---|
| | अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग व नगरपंचायत |
| सर्वसाधारण* | रु.३०००/- | रु.२०००/- | रु.१०००/- |
| अनुसूचित जाती | रु.१५००/- | रु.१०००/- | रु.५००/- |
| अनुसूचित जमाती | रु.१५००/- | रु.१०००/- | रु.५००/- |
| नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | रु.१५००/- | रु.१०००/- | रु.५००/- |
| सर्व प्रवर्गातील महिला | रु.१५००/- | रु.१०००/- | रु.५००/- |

*सर्वसाधारण जागेवर जरी अनुसूचित जाती/जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या उमेदवारांनी अर्ज केला तर त्यास अर्धीच अनामत रक्कम देय राहील. परंतु अशी सूट देण्यास तो पात्र आहे याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवाराने जात प्रमाणपत्रासंबंधी नामनिर्देशनपत्रासोबत सादर केलेली कागदपत्रे तपासून स्वतःची खात्री करतील. उमेदवाराकडून अनामत रक्कम स्वीकारणे व त्याबाबत पोहोच पावती देणे यासंदर्भात योग्य व्यवस्था करावी.

एकाच निवडणूक प्रभागातील एका जागेसाठी एकापेक्षा जास्त नामनिर्देशन पत्रे भरली तरी अनामत रक्कम एकदाच स्वीकारण्यात यावी. परंतु वेगवेगळया प्रभागांमधील अथवा जागांकरीता स्वतंत्र अनामत रक्कम भरावी लागेल.

## ८ प्रभागातील एकाच जागेची निवडणूक लढविता येते :

राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/नपा-२०१६/प्र.क्र.२८/का.६, दि.१८/१०/२०१६ अन्वये बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एक उमेदवार एका प्रभागातील एकाच जागेवर निवडणूक लढवू शकेल. तथापि, अन्य प्रभागातील जागेवर त्या उमेदवाराने निवडणूक लढविण्यास बंदी असणार नाही. एका उमेदवाराने **एकाच प्रभागातील एकापेक्षा जास्त जागांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास छाननीच्यावेळी कोणत्या जागेची निवडणूक लढवावयाची आहे याविषयी उमेदवाराची लेखी इच्छा विचारात घेण्यात यावी. उमेदवाराने अशी इच्छा व्यक्त न केल्यास प्रथमत: प्राप्त झालेले वैध नामनिर्देशनपत्र विचारात घेण्यात यावे.** या आदेशांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसारच्या मतपत्रिकेचे नमुने देखील विहित करण्यात आले आहेत.

## ९ उमेदवाराचे मतपत्रिकेवरील नाव छापण्याबाबत :

एखादा उमेदवार आपले नाव मतपत्रिकेवर कशा प्रकारे छापण्यात यावे, याबाबत नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटची तारीख व वेळ यापूर्वी विहित नमून्यात ( प्रकरण-१८, नमुना-१५ ) कळवू शकतो. उमेदवाराचे नाव मतपत्रिकेवर त्यानुसार छापण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी निर्णय घेऊ शकतात. मात्र, त्यानुसार नावे छापताना त्याचा मतपत्रिकेवरील अनुक्रम नगर विकास विभागाने दि.०१/०४/२०२६ रोजी नियमात दुरूस्ती केल्यानुसार त्याचा मतपत्रिकेवरील क्रम गटनिहाय त्याचे मराठी वर्णानुक्रमे आडनाव, नाव व पत्ता विचारात घेऊन त्यानुसार राहील. यासंदर्भात प्रकरण ७ मधील परिच्छेद ४ मध्ये सविस्तर सूचना दिल्या आहेत.

## १० प्राप्त नामनिर्देशनपत्रांना अनुक्रमांक देणे :

१०.१ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशन पत्रांना अनुक्रमांक देणे आवश्यक आहे, उदा.नपा----/सा.नि. २०--/प्रभाग.क्र.---/जागा क्र.-----अ.क्र.----- तसेच न चुकता प्राप्तीची वेळ, तारीख टाकून सही करावी. सोयीकरिता एक स्वतंत्र रजिस्टर ठेवावे, जेणेकरून दररोज प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशन पत्रांना सलग क्रमांक देताना गोंधळ होणार नाही.

१०.२ एका निवडणूक प्रभागातील एका जागेसाठी एका उमेदवारास जास्तीत जास्त चार नामनिर्देशनपत्रे भरता येतात व ती तो एकाचवेळी वा वेगवेगळी आणून देऊ शकतो. जर उमेदवार एकाच वेळी ती आणून देत असेल तर त्या सर्वांना एकामागे एक क्रमांक द्यावेत.

## ११ नामनिर्देशन पत्राची प्राथमिक तपासणी :

**११.१** नामनिर्देशन पत्राची प्राथमिक तपासणी म्हणजे छाननी नव्हे, या तपासणीचा उद्देश केवळ टाळल्या जाऊ शकल्या जाणाऱ्या छोट्याशा तांत्रिक वा टंकलेखनाच्या चुकांमुळे नामनिर्देशन पत्र फेटाळले जाऊ नये हा आहे, याकरिता पुढील नमूद केलेल्या बाबी तपासाव्यात:-

i. **राखीव जागा असल्यास उमेदवाराचा प्रवर्ग :**

जी जागा ज्या प्रवर्गासाठी राखीव आहे, त्याच प्रवर्गातील उमेदवारांना सदर जागेची निवडणूक लढविता येईल. सबब, सादर करण्यात आलेले नामनिर्देशन पत्र हे त्याच प्रवर्गासाठी आहे याची खात्री करावी.

ii. **विशेष मागास प्रवर्गात कोणाचा समावेश होतो :**

शासनाने विशेष मागासप्रवर्गात ज्या प्रवर्गाचा समावेश केला आहे त्यांना नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यामधून निवडणूक लढविता येईल. यासंदर्भात राज्य

निवडणूक आयोगाचे पत्र क्र.एसईसी/एमएमसी ११९६/प्र.क्र.१९६/का-३,दि.७/१०/१९९६ व शासनाचे पत्र क्र. सीबीसी-१०९६/सी-१२५८/ प्र.क्र.२३८/ मावक-५, दि.५/१०/१९९६ पत्र पहावे.

iii. **नामनिर्देशन पत्रावर उमेदवार, सूचक/प्रस्तावक यांची सही आहे.**

iv. **उमेदवार, सूचक यांचे मतदार यादीतील अनुक्रमांक :**

नामनिर्देशन पत्रात नमूद उमेदवारांचे सूचक यांचे क्रमांक चुकीचे असतील पण त्यांचे नाव संबंधित मतदार यादीत असेल तर नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात यावे. मूळ मतदार यादीतच नाव वा फोटोबाबत खात्रीलायक टंकलेखनीय चूक दिसून येत असेल तर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने त्याबाबत स्वत: खात्री करावी व योग्य तो निर्णय (राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५, दि.१४/०७/२०२५ रोजीचे आदेशातील मुद्दा क्र.३ नुसार) घ्यावा.

v. **विवाहित महिलेचे मतपत्रिकेवरील नाव :**

विवाहित महिला उमेदवारास, मतदार यादीमध्ये व नामनिर्देशन पत्रामध्ये नमूद असलेल्या नावाखेरीज त्यांना मतपत्रिकेवर इतर नावाचा उल्लेख करण्याची इच्छा असेल तर नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी संबंधित उमेदवाराने तसा विनंती अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर केला असल्यास व त्यासोबत त्या पृष्ठर्थ आवश्यक पुरावे उदा. विवाह नोंदणी प्रमाणपत्र , राजपत्रात प्रसिध्द केलेले विवाहनंतरचे नाव इ., सादर केले आहे किंवा कसे याबाबत तपासणी करावी. मात्र सदरचे कागदपत्र उपलब्ध नसल्यास मतदाराने मतदान करण्यापूर्वी आपली ओळख पटविण्यासाठी आयोगाचे क्र.रानि-आ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५, दि.१४/०७/२०२५ रोजीच्या आदेशात नमूद केलेल्या १२ पुराव्यांपैकी उमेदवारास हव्या असलेल्या नावासहीत छायाचित्र असलेला कोणताही एक पुरावा जोडला आहे का ते तपासावे.

vi. **मतदार यादीचा उतारा (उमेदवार अन्य प्रभागातील मतदार असल्यास) :**

उमेदवार हा दुसऱ्या प्रभागातील मतदार असेल त्या बाबतीत, त्या प्रभागातील मतदार यादी किंवा तिचा संबंधीत भाग किंवा त्या मतदार यादीतील संबधीत नोंदीची एक प्रमाणित प्रत ही नामनिर्देशन पत्रासोबत घ्यावी.

vii. **जात प्रमाणपत्र/जातवैधता प्रमाणपत्र अथवा पुरावा :**

राखीव जागेसाठी (अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग) निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच नामनिर्देशन पत्राच्या

छाननीच्यावेळी पडताळणीसाठी मूळ जाती प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

मात्र शासनाने दि. २६/१२/२०२५ च्या अधिनियमातील सुधारणेनुसार जात वैधता प्रमाणपत्र दाखल करण्यास निवडून आल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांची मुभा दिली आहे. त्यामुळे नामनिर्देशनपत्र दाखल करताना उमेदवारास जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत अथवा अन्य कोणताही पुरावा नामनिर्देशनपत्रासोबत देता येईल. तसेच त्याने निवडून आल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे हमीपत्र नामनिर्देशनपत्रासोबत देणे आवश्यक आहे.

viii. **हमीपत्र :**

नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी उमेदवाराने जात प्रमाणपत्र पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा सादर करावा. तसेच निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील असे हमीपत्र घेणे आवश्यक आहे. छाननीच्यावेळी पडताळणीसाठी उमेदवाराने उपरोक्त नमूद कागदपत्रे सादर न केल्यास नामनिर्देशन पत्र नाकारण्यात येईल याची कल्पना उमेदवारांस द्यावी.

ix. **शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र :**

शासनाने सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१९ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य होण्याकरीता शौचालयाच्या वापराबाबतची सुधारणा केली आहे. त्यानुसार पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र किंवा स्वयंप्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असून आयोगाच्या पत्र क्र.रानिआ/जिपंस-२०२४/प्र.क्र.०४/का.७, दि.१६ जुलै, २०२४ अन्वये विहित केलेले प्रमाणपत्र / स्वयंप्रमाणपत्र घेण्यात यावे.

x. **तृतीयपंथी उमेदवार :**

सर्व तृतीयपंथी यांना त्यांनी स्वसमजानुसार केलेल्या लिंग ओळखीच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्याच्या अधिकार असून अशा निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने इतर सर्व हेतूंसाठी त्याच निवडलेल्या लिंगाचा वापर केलेला असावा व अशी निवडणूक लढविणारी व्यक्ती इतर सर्व कारणांसाठी त्याच निवडलेल्या लिंगाचा वापर करेल आणि तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम २०१९ मध्ये दिलेल्या योग्य प्रक्रियेचे पालन केल्याशिवाय केवळ संधी आहे

म्हणून लिंगाची ओळख बदलणार नाही असे शपथपत्र घेण्यात यावे. (याबाबत आयोगाचे आदेश क्र.रानिआ/ग्रापनि-२०२१/प्र.क्र.७/का.८,दि.२७/०८/२०२१ पहावे.)

xi. **राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांबाबतची सूचना:**

महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ दि. ०५ मे, २०२५ अन्वये विहित केलेले जोडपत्र - १ व २ च्या मूळ स्वाक्षरीच्या प्रती राजकीय पक्ष/ उमेदवार यांनी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अखेरच्या तारखेस दुपारी ३.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

मात्र, राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/रापनो-२०२४/प्र.क्र. २४/का.११, दि. ०७ नोव्हेंबर, २०२५ नुसार जोडपत्र- १ च्या लेखी सूचनांच्या प्रती जिल्हाधिकारी यांना देवून त्याची छायांकित प्रत उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. जिल्हाधिकारी यांनी अशावेळी जोडपत्र- १ च्या प्रती प्रमाणीत करुन संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे पाठवाव्यात.

जोडपत्र - २ वर राजकीय पक्षाने प्राधिकृत केलेल्या व्यक्तिची पेनाने केलेली मूळ सही (शाई मधील) असणे आवश्यक राहील. फॅक्स, झेरॉक्स, ई-मेल, WhatsApp वरील चालणार नाही.

xii. **परिपूर्ण शपथपत्र:**

उमेदवाराने सादर केलेली, गुन्हेगारी पार्श्वभूमी व स्थावर / जंगम मालमत्तेचा तपशील देणारे शपथपत्र राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०८/०१/२०१५ च्या आदेशानुसार स्टॅम्प पेपरवर करण्याची आवश्यकता नाही. परंतु संबधित शपथपत्रातील कोणताही रकाना / माहिती कोरी ठेवू नये. माहिती निरंक/संबंधीत नसल्यास / वा माहित नसल्यास (Nil / Not applicable or Not Known) तसे शेरे असणे आवश्यक आहे. रकाने कोरे ठेवल्यास नामनिर्देशनपत्र नाकारले जाऊ शकते. (आयोगाच्या क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.५/का.६, दि.२७/०३/२०१५ च्या पत्रासोबतच्या भारत निवडणूक आयोगाच्या आदेश क्र.५७६/३/२०१३-एसडीआर, दि. ३०/०९/२०१३ मध्ये दिलेल्या सूचना तपासाव्यात.)

परंतु शपथपत्रातील गुन्हेगारी पार्श्वभूमी व मालमत्तेचा तपशील इत्यादीबाबतच्या माहितीची छाननी अथवा सत्यता निवडणूक निर्णय अधिकारी पडताळून पाहणार नाही अथवा या कारणासाठी नामनिर्देशनपत्र नाकारणार नाही.

## ११.२ पडताळणी सूची:

उमेदवारांनी दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्रांमध्ये सर्व तपशील भरलेला आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता पडताळणी सूची(check list) वापरण्यात यावी. पडताळणी सूचीच्या दिलेल्या नमुन्यात आवश्यकतेनुसार योग्य ते बदल करुन वापरण्यात यावा. ( प्रकरण-१८, नमुना-३ )

**११.३ प्राथमिक तपासणीतील त्रूटी उमेदवारास कळविणे:**

प्राथमिक तपासणीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास त्रुटी आढळल्यास, संबंधित उमेदवारास ती पडताळणी सूचीद्वारे (Check list) लक्षात आणून द्यावी. सदरची चेक लिस्ट २ प्रतीत ठेवावी व त्यावर सही करून एक प्रत उमेदवारास द्यावी. स्थळ प्रतीवर उमेदवाराची सही घेऊन नामनिर्देशन पत्रास लावून ठेवावी.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास प्राथमिक तपासणीत लक्षात आलेल्या त्रुटी उमेदवारांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात व त्रुटी दूर करण्याची त्यांना संधी देण्यात यावी; जेणेकरुन त्यांना त्या दुरूस्त करण्याची संधी मिळू शकेल. मात्र याकरिता उमेदवाराने वेळेत नामनिर्देशन पत्र दाखल करणे व त्रृटी असल्यास त्याची पुर्तता करणे अपेक्षित आहे. नामनिर्देशपत्र दाखल केल्यानंतर त्यात दुरूस्ती करता येणार नाही. मात्र, उमेदवारास नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिनांक व वेळेपर्यंत नव्याने नामनिर्देशन पत्र देखील दाखल करता येईल. (राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.३२/का-५, दि.०१ एप्रिल, २०१७.)

नामनिर्देशन दाखल करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवार नामनिर्देशनपत्र दाखल करीत असल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना चेकलिस्ट तयार करून ती उमेदवरास देणे, तसेच त्यामधील त्रृटींची पुर्तता करून घेणे याबाबी शक्य होणार नाहीत. तसेच नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची वेळ संपल्यानंतर नामनिर्देशनपत्रात उमेदवारास कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही. तसेच कोणतीही कागदपत्रे जोडता येणार नाहीत. यासंदर्भात राजकीय पक्षांच्या बैठकीत यासंदर्भात स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

**१२. अपवादात्मक परिस्थितीत ऑनलाईन मधील प्रिंटआउट मध्ये दुरूस्ती :**

उमेदवाराने नामनिर्देशन पत्र ऑनलाईन पध्दतीने भरले असल्यास संगणक प्रणालीमध्ये माहिती भरुन त्याचे प्रिंट आऊट घेतल्यानंतर त्यामध्ये काही दुरुस्ती करणे उमेदवारास आवश्यक वाटल्यास त्यांना त्यामध्ये हाताने दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी. अशी दुरूस्ती ज्या ठिकाणी केली जाईल त्या ठिकाणी उमेदवारांनी दिनांकासह स्वाक्षरी करणे आवश्यक राहिल. उमेदवाराने अशारितीने हाताने दुरूस्ती केली

असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यानुसार संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक त्या सुधारणा कराव्यात.

उमेदवारांना वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्याची संधी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिनांकाच्या अंतिम वेळेपर्यंतच देण्यात यावी. (राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.३२/का-५, दि.०१ एप्रिल, २०१७.)

**मे-जुन २०२६ मधील नगरपरिषद/ नगरपंचायत सार्वत्रिक/ पोट निवडणूक साठी नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे फक्त पारंपारिक पध्दतीने (ऑफलाईन) दाखल करावयाचे आहेत व त्यानुसार कार्यवाही करावी.**

**१३. अखेरच्या दिवशी वेबसाईट हँग झाल्यास :**

नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी वेबसाईट हँग झाल्यामुळे उमेदवार संगणकीय प्रणालीमध्ये नामनिर्देशन पत्र तसेच शपथपत्रातील माहिती भरुन त्याची प्रिंट घेऊ शकणार नाहीत अशी परिस्थिती उद्भवल्यास व याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांची खात्री झाल्यास त्यांनी राज्य निवडणूक आयोगाशी संपर्क साधून आयोगाचे निर्देश प्राप्त करुन घ्यावेत.

**मे-जुन २०२६ मधील नगरपरिषद/ नगरपंचायत सार्वत्रिक/ पोट निवडणूक साठी नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे फक्त पारंपारिक पध्दतीने (ऑफलाईन) दाखल करावयाचे आहेत व त्यानुसार कार्यवाही करावी.**

**१४. विवाहित स्त्रि च्या जात प्रमाणपत्रातील नावाबाबत :**

राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या विवाहीत स्त्री उमेदवाराने नामनिर्देशन पत्रासोबत विवाहपूर्वीच्या नावाने मिळविलेले जात प्रमाणपत्र अथवा जात वैधता प्रमाणपत्र तिच्या नावात बदल झाल्याचा पुराव्यासह अथवा नावात बदल झाला असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केल्यास ते स्वीकारण्यात यावे. (राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.३२/का-५, दि.०१ एप्रिल, २०१७ व रानिआ/नप-२०२५/ प्र.क्र.०१/का-६, दि.१३ मार्च, २०२५)

**१५. नामनिर्देशन पत्राची पोहोच :**

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी उमेदवारांना नामनिर्देशन पत्राची प्राथमिक चाचणी करून चेकलिस्ट दिल्यानंतर नामनिर्देशन पत्राच्या “भाग चार” मध्ये असणारी पोहोच, छाननीचे ठिकाण व वेळ नमूद करून स्वतच्या: सहीने दयावी.

**१६. नामनिर्देशनपत्र व शपथपत्राचा प्रसार :**

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने, उमेदवारांनी सादर केलेली प्राप्त नामनिर्देशनपत्र व शपथपत्राच्या प्रती, सूचना फलकावर चिकटवून व वेबसाईटवर टाकून त्याचा प्रसार करावयाचा आहे . प्रचाराचा कालावधी संपेपर्यंत निवडणूक लढविणारा उमेदवार तसेच प्रसिध्दी माध्यमे यांना योग्य ते शुल्क आकारुन त्याच्या प्रती देता येतील. कोणत्याही प्रतिस्पर्धी उमेदवाराने स्वतः शपथपत्राद्वारे परस्परविरोधी माहिती सादर केली असली तरी त्या माहितीचा देखील वरीलप्रमाणेच प्रसार करावयाचा आहे.

तसेच दररोज प्राप्त नामनिर्देशन पत्राची माहिती, प्रभागनिहाय तयार करुन सूचना (प्रकरण-१८, नमुना-२) फलकावर व वेबसाईटवर प्रसिध्द करावयाची आहे.

## १७ खर्चाची मर्यादा व विहीत मुदतीत खर्च सादर करणे :

### १७.१ खर्चाची मर्यादा :

आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४५/का-५, दि. २९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता उमेदवाराने करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे:-

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | सुधारीत खर्चाची मर्यादा (रुपये) | |
|---|---|---|---|
| नगरपरिषद/ नगरपंचायत | | | |
| | | थेट नगराध्यक्ष | सदस्य |
| १ | अ वर्ग नगरपरिषद (न.प.) | १५,००,००० | ५,००,००० |
| २ | ब वर्ग (न.प.) | ११,२५,००० | ३,५०,००० |
| ३ | क वर्ग (न.प.) | ७,५०,००० | २,५०,००० |
| ४ | नगर पंचायत | ६,००,००० | २,२५,००० |

उमेदवाराने उक्त नमूद मर्यादेतच निवडणूक खर्च करावयाचा आहे.

### १७.२ निवडणूक खर्चाकरीता बँक अकाउंट :

आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२०२३ / उनिख/प्र.क्र.१३ / संगणकीकरण कक्ष (ब), दि.१५/०२/२०२४ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे तसेच त्याअनुषंगाने करावयाची कार्यपध्दती निश्चित केली आहे. त्यानुसार निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने राष्ट्रीयकृत/ शेड्यूल्ड/ सहकारी बँकेत एक स्वतंत्र खाते (बचत किंवा चालू) उघडावे व त्या खात्याचा तपशील नामनिर्देशनपत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे.

उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत अशा बँक खात्याच्या पासबुकच्या पहिल्या पृष्ठाची प्रत आणि अद्ययावत अकाऊंट स्टेंटमेंटची स्वसाक्षांकित प्रत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

**१७.३ निवडणूक खर्चाचा हिशोब ३० दिवसात सादर करण्याबाबत हमीपत्र :**

उमेदवाराने विहित नमुन्यात निवडणूक खर्चाचा तपशील निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर न केल्यास तो अनर्ह ठरू शकतो याबाबतची कल्पना उमेदवारास दयावी व त्यांचेकडून तसे हमीपत्र नामनिर्देशन पत्रासोबत घ्यावे.

**१८ एका उमेदवाराची सर्व नामनिर्देशनपत्रे छाननीकरीता एकत्र ठेवणे :**

नामनिर्देशन पत्र व त्यासोबतची सर्व कागदपत्रे चेक लिस्टसह, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या ताब्यात राहतील. छाननीवेळी एका उमेदवाराची सर्व नामनिर्देशन पत्रे एकत्र तपासावयाची असल्याने नामनिर्देशन पत्रे व त्यासोबतची कागदपत्रे सोयीकरिता, उमेदवारनिहाय एका प्लॅस्टीक फोल्डरमध्ये ठेवावीत.

**१९ सर्व नामनिर्देशित उमेदवारांची यादी :**

नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतिम दिवशी, शक्य तितक्या लवकर नामनिर्देशन पत्र दाखल करणाऱ्या सर्व उमेदवारांची यादी, निवडणूक प्रभागनिहाय व जागानिहाय तयार करुन सूचना फलकावर व वेबसाईटवर प्रदर्शित करावयाची आहे. (प्रकरण-१८, नमुना-२)

**२०. निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक:-**

१) निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक करण्याकरीता उमेदवार विहित नमुन्यात (प्रकरण-१८, नमुना-८) नेमणुकीची सूचना दोन प्रतीमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे देतील. निवडणूक निर्णय अधिकारी त्यातील एकप्रत उमेदवारांच्या प्रतिनिधींना सदर नेमणुकीस मान्यता असल्याबाबतची पोचपावती आपल्या सही शिक्क्यानिशी देतील. निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी “फोटो ओळखपत्रे” जारी करतील.

२) निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक रद्द केल्याची किंवा निवडणूक प्रतिनिधीचे निधन झाल्यास सदरची सूचना ( प्रकरण-१८, नमुना-९ ) देतील.

**२१. मतदान प्रतिनिधींची नेमणूक:-**

१) उमेदवारास प्रत्येक मतदान केंद्राकरीता किंवा जेथे मतदान घेण्यासाठी ठिकाण नक्की केले आहे त्यासाठी एक मतदान प्रतिनिधी व एक बदली मतदान प्रतिनिधींची नेमणूक करता येईल.

२) अशी प्रत्येक नेमणूक उमेदवार किंवा त्यांचा निवडणूक प्रतिनिधी मतदान केंद्रावर किंवा मतदान घेण्यासाठी नक्की केलेल्या स्थळी विहित नमुन्यात ( प्रकरण-१८, नमुना-१० ) तपशील भरून सादर करतील. मतदान केंद्राध्यक्ष त्यांना बिल्ले पुरवितील.

३) विहित नमुन्यात ( प्रकरण-१८, नमुना-१० ) नेमणुकीचे पत्र, पूर्ण भरलेले व घोषणापत्र मतदान केंद्राध्यक्षांसमोर सही केल्याशिवाय मतदान प्रतिनिधीला मतदान केंद्रामध्ये मतदानाच्या दिवशी प्रवेश मिळणार नाही.

## २२. मतदान प्रतिनिधींची नेमणूक रद्द करणे किंवा मतदान प्रतिनिधींचे निधन:-

१) मतदान प्रतिनिधींची नेमणूक रद्द करण्याबाबत विहित नमुन्यामध्ये ( प्रकरण-१८, नमुना-१) उमेदवार किंवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांचे सहीने मतदान केंद्राध्यक्षांना (अर्ज) सादर करतील. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास ज्या दिवशी असा अर्ज प्राप्त होईल त्या दिवसापासून सदर नेमणूक रद्द झाल्याचे मानण्यात येईल. तरी सदर घोषणापत्राची रितसर पोहोच द्यावी.

**२) उमेदवार किंवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी मतदान बंद होण्यापूर्वी कोणत्याही वेळी तात्काळ सूचना देऊन दुसऱ्या मतदान प्रतिनिधींची नेमणूक करतील.**

## २३. प्रतिनिधी म्हणून कोणास नेमता येणार नाही :

प्रतिनिधींच्या नेमणूका करताना ज्या व्यक्तीस मतदान करण्यास किंवा निवडून येण्यास अपात्र ठरविण्यात आले असेल अशी व्यक्ती निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमता येणार नाही. तसेच राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२३/का.७, दि.१९/१०/२०१६ अन्वये राज्य विधानमंडळ सदस्य (विधान सभा / विधान परिषद), संसद सदस्य (लोकसभा / राज्य सभा), केंद्र शासन वा राज्य शासनाचा मंत्री तसेच कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेचा आजी सदस्य तसेच सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नेमण्यात येऊ नये.

## २४ ओळखपत्र :

उमेदवारांप्रमाणे निवडणूक प्रतिनिधींना देखील छायाचित्र असलेले ओळखपत्र देण्यात यावे. त्यासाठी उमेदवाराने २ प्रतीत विहीत नमुन्यात (प्रकरण- ८ मधील विहीत

नमुना) सादर करावे. त्याने सादर केलेल्या नमुन्यावरच उजव्या कोपऱ्यात निवडणूक प्रतिनिधीचा फोटो लावावा व सदर फोटो निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने साक्षांकीत करावा व तेच ओळखपत्र म्हणून वापरावे.

**२५ आचारसंहिता व इतर निर्बंध**

२५.१ नामनिर्देशन पत्र दाखल करणाऱ्या प्रत्येक उमेदवारास आयोगाकडून निर्गमित केलेल्या आचारसंहिता व इतर निर्बंध विषयक आदेशांचा संच देण्यात यावा. उदा.

१. आचारसंहितेचे एकत्रित आदेश क्र. रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का-७, दि. ०४ नोव्हेंबर, २०२५

२. पोस्टर्स, पॅम्प्लेटस् छपाई वरील निर्बंध (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.- एसईसी १०९५/सीआर-७७/९५/ डेस्क-३, दि.२८/०८/१९९५)

३. निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५, क्र.रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का-१०, दि. ०९ ऑक्टोबर, २०२५.

२५.२ उपरोक्त सर्व निर्बंधांचे काटेकोर पालन केले जाईल याबाबतची दक्षता निवडणूक निर्णय अधिकारी घेईल तसेच आपल्या क्षेत्रातील स्थानिक छपाई कारखाने व इतर वृत्तपत्रे यांनादेखील या निर्बंधाची कल्पना देईल.

# प्रकरण - ४
# छाननी

**१ छाननी कोणास करता येईल :**

नामनिर्देशन पत्राची छाननी निवडणूक निर्णय अधिकारी स्वत: करील. कोणत्याही परिस्थितीत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सदर काम सोपवू नये. परंतु छाननीचे काम पार पाडण्यास निवडणूक निर्णय अधिकारी हे अपरिहार्य अशा परिस्थितीमुळे असमर्थ असतील तर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी हे छाननीचे काम करु शकतात. त्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांना लेखी प्राधिकृत करणे आवश्यक आहे.

**२ छाननी-अर्ध-न्यायीक जबाबदारी** (Quasi- Judicial Duty)

२.१ छाननी करतेवेळी आपण अर्ध-न्यायीक जबाबदारी पार पाडत आहोत याची जाणीव असावी. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता आपण ठामपणे आपला निर्णय देणे अपेक्षित आहे. आपली भूमिका नि:पक्ष, पारदर्शक व सर्व उमेदवारांसाठी समान राहील याची काळजी घ्यावी. बऱ्याच वेळा उमेदवार वा त्यांचे प्रतिनिधी आरोप/प्रत्यारोप करू शकतात, तरी आपण आपला तोल ढळू न देता आपला निर्णय ठामपणे व योग्य त्या कारणमिमांसेसह नोंदवावा.

२.२ आपला निर्णय देताना आपण आपले वरिष्ठ, आयोग, आयोगाच्या प्रतिनिधी / निरीक्षक यांचेकडूनही कोणतेही तोंडी वा लेखी आदेश घेणे अपेक्षित नाही. सबब अधिनियम / नियमातील तरतुदी, आयोगाचे व शासनाचे अद्ययावत आदेश यांचे आधारे आपला निर्णय द्यावा.

**३ छाननी साठी उपस्थित राहण्यास कोण पात्र आहे?**

३.१ नगरपरिषदा, नगरपंचायती निवडणूक नियमावली १९६६ च्या नियम १३ अन्वये छाननीच्या तारखेस व वेळेस उमेदवार, त्याचा निवडणूक प्रतिनिधी, एक प्रस्तावक आणि उमेदवाराने लेखी प्राधिकृत केलेली एक व्यक्ती यांचे व्यतिरिक्त अन्य कोणालाही छाननीच्या ठिकाणी उपस्थित राहाता येणार नाही.

३.२ छाननीच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार टाळणेकामी व अनावश्यक गर्दी रोखणे कामी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा.

३.३ एखाद्या उमेदवाराने वा सूचक / निवडणूक प्रतिनिधी / प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने अन्य उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र /शपथपत्र वा दाखल केलेली कागदपत्रे तपासणीस मागितल्यास ती दाखवण्याची व्यवस्था करावी.

**४ सर्व नामनिर्देशन पत्राची छाननी करणे :**

४.१ प्राप्त सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे आवश्यक आहे.

४.२ एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा जास्त नामनिर्देशन पत्र दाखल केली असल्यास ती सर्व एका मागोमाग एक अशारितीने छाननी केली जातील. उमेदवाराचे एक नामनिर्देशन पत्र स्विकृत झाले म्हणून अन्य नामनिर्देशन पत्र छाननी न करता ठेवले जाणार नाही.

४.३ नगरपालिका/ नगरपंचायती निवडणूक नियम १९६६ च्या नियम क्र.१३ मधील तरतुदीनुसार **नामनिर्देशन नामंजूर करता येईल ती कारणे खालीलप्रमाणे आहेत:-**

अ) उमेदवारास, उक्त अधिनियमाद्वारे निवडणुकीसाठी पात्र ठरविण्यात आलेले नसल्यास किंवा अपात्र ठरविण्यात आल्यास;

ब) उमेदवारास नामनिर्दिष्ट करण्यासाठी सूचक अपात्र असल्यास;

क) उक्त अधिनियमाच्या किंवा नियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या तरतुदींचा भंग करण्यात आला असेल;

ड) उमेदवार किंवा सूचक हा यथास्थिती अशा उमेदवाराचा किंवा सूचकाचा मतदान क्रमांक म्हणून नामनिर्देशनपत्रात ज्या व्यक्तीचा मतदान क्रमांक निर्दिष्ट करण्यात आला असेल ती व्यक्ती नसल्यास;

इ) उमेदवार किंवा सूचक यांची नामनिर्देशनपत्रावरील सही खरीखुरी सही नसल्यास किंवा ती फसवणुकीने मिळविण्यात आली असल्यास.

**४.४ पर्यायी उमेदवाराचा उल्लेख वैधरित्या नामनिर्देशीत उमेदवारांच्या यादीमध्ये करण्याबाबत:-** राज्य निवडणूक आयोगाने क्र.**रानिआ/नप/प्र.क्र.९/का-६, दि.१४/०५/२०२६ अन्वये यासंदर्भात सविस्तर** आदेश दिले असून त्यानुसार यासंदर्भात खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती निवडणूक नियम १९६६ च्या नियम १२(२) मधील तरतुदीनुसार नगरपरिषद/नगरपंचायत निवडणुकीकरीता नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्षाच्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रावर एक प्रस्तावक तर नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षाचा उमेदवार व अपक्ष उमेदवाराने त्याच्या नामनिर्देशनपत्रावर पाच प्रस्तावक देणे आवश्यक आहे.

राज्य निवडणूक आयोगाने दि. ०५ मे, २०२५ च्या आदेशान्वये एखाद्या पक्षाच्या वतीने निवडणूक लढवावयाची असल्यास द्यावयाचे जोडपत्र १ व २ विहित केले आहे. त्यानुसार पक्षाने ज्या उमेदवारास मूळ उमेदवारी द्यावयाची आहे त्याचे नाव द्यावयाचे असून मूळ उमेदवाराचे

नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये रद्द झाल्यास अथवा मूळ उमेदवाराने माघार घेतल्यास त्याची जागा घेणाऱ्या पर्यायी उमेदवाराचे नाव देण्याबाबत तरतूद आहे.

वरील बाबींचा विचार करता नगरपरिषद/नगरपंचायत निवडणुकांमध्ये पर्यायी उमेदवारांच्या संदर्भात पुढील शक्यता उद्भवतात.

**(अ) नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांसाठी:-**

| **१) छाननीनंतर वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी जाहीर करताना** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्षाचा मूळ उमेदवार** | **नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्षाचा पर्यायी उमेदवार** | **शक्यता** |
| १ | नामनिर्देशनपत्र वैध<br>पक्षाचे जोडपत्र १ व २ आहे | नामनिर्देशनपत्र वैध<br>**एक सूचक/पाच सूचक**<br>पक्षाचे जोडपत्र १ व २ आहे<br>जोडपत्र २ मध्ये पर्यायी उमेदवार म्हणून नाव आहे | मूळ उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार असेल<br>पर्यायी उमेदवाराचे नाव वैधरीत्या नामनिर्देशित उमेदवारांच्या यादीमध्ये **पर्यायी उमेदवार म्हणूण येईल.** |
| २ | नामनिर्देशनपत्र **अवैध** | नामनिर्देशनपत्र वैध<br>एक सूचक/पाच सूचक<br>पक्षाचे जोडपत्र १ व २ आहे<br>जोडपत्र २ मध्ये पर्यायी उमेदवार म्हणून नाव आहे. | पर्यायी उमेदवाराचे नाव वैधरीत्या नामनिर्देशित उमेदवारांच्या यादीमध्ये **पक्षाचा मूळ उमेदवार म्हणून येईल.** |
| **२) उमेदवारी मागे घेतल्यानंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी जाहीर करताना** | | | |
| **अ.क्र.** | **नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्षाचा मूळ उमेदवार** | **नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्षाचा पर्यायी उमेदवार** | **शक्यता** |
| १ | नामनिर्देशनपत्र वैध<br>पक्षाचे जोडपत्र १ व २ आहे<br>**उमेदवारी मागे घेतली नाही** | नामनिर्देशनपत्र वैध<br>**एक सूचक**<br>पक्षाचे जोडपत्र १ व २ आहे<br>जोडपत्र २ मध्ये पर्यायी उमेदवार म्हणून नाव आहे<br>उमेदवारी मागे घेतली नाही. | मूळ उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार असेल<br>पर्यायी उमेदवाराचे नाव **निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत येणार नाही.** |
| २ | नामनिर्देशनपत्र वैध<br>पक्षाचे जोडपत्र १ व २ आहे<br>**उमेदवारी मागे घेतली नाही** | नामनिर्देशनपत्र वैध<br>**पाच सूचक**<br>पक्षाचे जोडपत्र १ व २ आहे<br>जोडपत्र २ मध्ये पर्यायी उमेदवार म्हणून नाव आहे<br>उमेदवारी मागे घेतली नाही. | मूळ उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार असेल<br>पर्यायी उमेदवाराचे नाव निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत **अपक्ष उमेदवार म्हणून येईल.** |
| ३ | नामनिर्देशनपत्र वैध<br>पक्षाचे जोडपत्र १ व २ आहे | नामनिर्देशनपत्र वैध<br>एक सूचक/पाच सूचक | पर्यायी उमेदवाराचे नाव निवडणूक लढविणाऱ्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | **उमेदवारी मागे घेतली** | पक्षाचे जोडपत्र १ व २ आहे<br>जोडपत्र २ मध्ये पर्यायी उमेदवार म्हणून नाव आहे<br>उमेदवारी मागे घेतली नाही. | उमेदवारांच्या यादीत **पक्षाचा मूळ उमेदवार म्हणून येईल.** |

(ब) **नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांसाठी:-**

नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या सर्व उमेदवारांनी (मूळ उमेदवार तसेच पर्यायी उमेदवार दोघांनीही) नामनिर्देशनपत्रामध्ये पाच सूचक नमूद करणे आवश्यक आहे. मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरल्यास अथवा मूळ उमेदवाराने माघार घेतल्यास, अन्य बाबीनुसार पात्र ठरत असल्यास पर्यायी उमेदवार त्या पक्षाचा मूळ उमेदवार होईल.

जेव्हा नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षाचा मूळ उमेदवार वैधरित्या नामनिर्देशित झाला असेल व त्याने माघार घेतली नसेल अशा परिस्थितीमध्ये मूळ उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार ठरेल तसेच उपरोक्त पक्षाचा पर्यायी उमेदवार, जर अन्य बाबींची पूर्तता करत असल्यास व त्याने माघार घेतली नसेल तर अपक्ष उमेदवार होईल.

वरील शक्यतांचा विचार करता वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याच्या नमून्यामध्ये शेरा हा रकाना समाविष्ट करुन पर्यायी उमेदवाराची नोंद घ्यावी तसेच त्या नमुन्यांमध्ये खालील प्रमाणे टिपा नमूद कराव्यात.

**टीप- अ. नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांकरीता --**

१. वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांच्या यादीमध्ये पक्षाच्या पर्यायी उमेदवारांच्या नावासमोर शेरा या रकान्यात पर्यायी उमेदवार असे नमूद करावे. तसेच दाखल केलेल्या वैध नामनिर्देशनपत्रांवरील सूचकांची संख्या (एक/पाच) शेऱ्यामध्ये नमूद करावी.
२. जर मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनत्र वैध ठरले व त्याने माघार घेतली नसेल अशा परिस्थीतीमध्ये पक्षाचा मूळ उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार असेल. पर्यायी उमेदवाराने पाच सूचक देऊन वैध नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल केवळ त्याच परिस्थितीमध्ये तो अपक्ष उमेदवार होईल. अन्य परिस्थितीमध्ये पर्यायी उमेदवार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमध्ये येणार नाही.
३. मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये अवैध ठरल्यास अथवा त्याने माघार घेतल्यास जर पर्यायी उमेदवार वैधरित्या नामनिर्देशित असेल (एक सूचक/पाच सूचक) तर तो पक्षाचा मूळ उमेदवार होईल.

**टीप- ब. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांकरीता --**

१. वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांच्या यादीमध्ये पक्षाच्या पर्यायी उमेदवारांच्या नावासमोर शेरा या रकान्यात पर्यायी उमेदवार असे नमूद करावे.

२. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या सर्व उमेदवारांनी (मूळ उमेदवार तसेच पर्यायी उमेदवार दोघांनीही) नामनिर्देशनपत्रामध्ये पाच सूचक नमूद करणे आवश्यक आहे.

३. जेव्हा नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा मूळ उमेदवार वैधरित्या नामनिर्देशित झाला असेल व त्याने माघार घेतली नसेल अशा परिस्थितीमध्ये पक्षाचा मूळ उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार असेल, व पक्षाचा पर्यायी उमेदवार, जर अन्य बाबींची पूर्तता करत असेल (वैधरित्या नामनिर्देशित असेल) व जर त्याने माघार घेतली नसेल तर अपक्ष उमेदवार होईल.

४. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरल्यास अथवा मूळ उमेदवाराने माघार घेतल्यास अन्य बाबीनुसार पात्र ठरत असल्यास (वैधरित्या नामनिर्देशित असेल) पर्यायी उमेदवार त्या पक्षाचा मूळ उमेदवार होईल.

४.५ भविष्यात होऊ शकणारी न्यायप्रविष्ठ प्रकरणे लक्षात घेऊन, सर्व छाननी प्रक्रियेचे छायाचित्रण करावे.

## ५ एका प्रभागातील एकाच जागेची निवडणूक लढविता येते :

राज्य निवडणूक आयोगाचे दि.१८/१०/२०१६ रोजीच्या आदेशानुसार बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एक उमेदवार एका प्रभागातील एकाच जागेवर निवडणूक लढवू शकेल. तथापि, अन्य प्रभागातील जागेवर त्या उमेदवाराने निवडणूक लढविण्यास बंदी असणार नाही. एका उमेदवाराने एकाच प्रभागातील एकापेक्षा जास्त जागांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास छाननीच्यावेळी कोणत्या जागेची निवडणूक लढवावयाची आहे याविषयी उमेदवाराची लेखी इच्छा विचारात घेण्यात यावी. उमेदवाराने अशी इच्छा व्यक्त न केल्यास प्रथमत: प्राप्त झालेले वैध नामनिर्देशनपत्र विचारात घेण्यात यावे.

## ६ आक्षेप व संक्षिप्त चौकशी:

६.१ प्राप्त सर्व नामनिर्देशनपत्राच्या वैधतेबाबत निवडणूक निर्णय अधिकारी स्वत: खात्री करेल. केवळ आक्षेप आले नाहीत म्हणून खातरजमा न करता कोणतेही नामनिर्देशनपत्र स्विकारले वा नाकारले जाणार नाही.

६.२ कोणत्याही नामनिर्देशन पत्रासंबधी घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत निर्णय देईल. आक्षेप नसेल तरीही एखादे नामनिर्देशन पत्र नाकारण्यास पात्र असेल तर त्याबाबतही योग्य तो खुलासा करून नाकारेल.

६.३ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १५ मधील अर्हता व कलम १६ मधील अनर्हता तसेच त्याअंतर्गत निवडणूक नियम क्र. १२ मधील तरतुदीनुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने कोणताही आक्षेप आल्यास वा असा आक्षेप दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीने घेतला असेल तर, त्याबाबतीत अशा आक्षेपाचे खंडन करण्यासाठी संबंधित उमेदवाराला वाजवी संधी देण्यात येईल व उमेदवार आवश्यक ते पुरावे सादर करील.

६.४ आक्षेपावरून वा स्वत:हून एखाद्या गोष्टीची खातरजमा करणेकामी निवडणूक निर्णय अधिकारी संक्षिप्त चौकशी करू शकतो. चौकशीअंती देण्यात येणाऱ्या निर्णयाची नोंद योग्य त्या खुलाशासह तो नामनिर्देशन पत्रावर करेल. आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीस तसेच मागेल त्यास निर्णयाची प्रत दयावी.

६.५ एखादे नामनिर्देशन पत्र स्विकारले वा नाकारले याची विधीग्राह्यता याबाबतचा निर्णय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नामनिर्देशन पत्रावर स्वत:च्या स्वाक्षरीने नोंदविल्याशिवाय पूर्ण होत नाही, तरी प्रत्येक नामनिर्देशन पत्रावर सदर नोंद घेतली जाईल याची खात्री करावी.

## ७ अहर्ता / अनर्हता ग्राह्य धरण्याचा दिवस

उमेदवार निवडणूक लढविण्यास पात्र आहे वा कसे हे ठरविण्यासाठी कोणता दिवस ग्राह्य धरण्यात यावा याबाबत वाद होऊ शकतो. अधिनियमातील तरतुदीनुसार वयाच्या बाबतची अर्हता (२१ वर्षे पूर्ण असणे) यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याकरिता निश्चित करण्यात आलेला अंतिम दिनांक ग्राह्य धरावा. अधिनियम/नियमामध्ये स्पष्ट तरतूद नसल्यास महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १६ नुसार अनर्हता आहे वा कसे हे ठरविण्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा दिवस ग्राह्य धरावा. इतर अनर्हतेबाबत छाननीचा दिवस ग्राह्य धरावा.

इतर कारणांसाठी अपात्र नसेल त्यावेळी संबंधित नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या कोणत्याही प्रभागातील मतदारांच्या यादीमध्ये केलेल्या नोंदीची प्रमाणित प्रत ही त्या नोंदीमध्ये नाव असलेल्या कोणत्याही मतदाराच्या, निवडणुकीसाठी उभे राहण्याच्या अधिकाराबाबत निर्णायक पुरावा असेल.

## ८ नामनिर्देशन पत्र नामंजूर करण्याचे सबळ कारण असल्याशिवाय कोणतेही नामनिर्देशन पत्र नामंजूर करु नये,

सबळ कारणे उदा. :

I. उमेदवारास, या अधिनियमाद्वारे निवडणुकीसाठी पात्र ठरविण्यात आलेले नसल्यास किंवा अपात्र ठरविण्यात आल्यास;

II. उमेदवारास नामनिर्दिष्ट करण्यासाठी सूचक अपात्र असल्यास;

III. उक्त अधिनियमाच्या किंवा नियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या तरतुदींचा भंग करण्यात आला असेल;

IV. उमेदवार किंवा सूचक हा यथास्थिती अशा उमेदवाराचा किंवा सूचकाचा मतदान क्रमांक म्हणून नामनिर्देशनपत्रात ज्या व्यक्तीचा मतदान क्रमांक निर्दिष्ट करण्यात आला असेल ती व्यक्ती नसल्यास;

V. उमेदवार किंवा सूचक यांची नामनिर्देशनपत्रावरील सही खरीखुरी सही नसल्यास किंवा ती फसवणुकीने मिळविण्यात आली असल्यास.

VI. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १६ नुसार किंवा त्याअंतर्गत नियमातील तरतुदीनुसार निवडणूक लढविण्यास उमेदवार म्हणून अपात्र ठरविण्यात आले आहे;

VII. योग्य अनामत रक्कम भरलेली नाही.

VIII. राखीव जागेवरुन नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास आवश्यक कागदपत्रे नाहीत.

एखाद्या उमेदवारास त्यांनी सादर केलेल्या नामनिर्देशन पत्रांपैकी एका नामनिर्देशन पत्राद्वारे योग्यरित्या नामनिर्दिष्ट केले असेल तर इतर नामनिर्देशन पत्रातील दोष/ अपूर्णतेच्या कारणास्तव त्याची उमेदवारी नामंजूर करण्यात आली असे धरले जाणार नाही.

## ९ छाननीचा निर्णय नोंदविणे :

निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक नामनिर्देशन पत्रावर ते स्विकारल्याबद्दल वा नाकारल्याबद्दल निर्णय लिहून ठेवील व नामंजूर करण्यात येणाऱ्या नामनिर्देशन पत्रावर नामंजूर केल्याबद्दलचे संक्षिप्त निवेदन लेखी नोंदवतील.

## १० वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी :

राज्य निवडणूक आयोगाने क्र.रानिआ/नपनपं-२०२६/प्र.क्र.०८/का-६, दि.१४/०५/२०२६ च्या आदेशान्वये सुधारित केलेल्या नमुन्यात ( प्रकरण-१८, नमुना-४ ) वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द करावी.

वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी, तारीख व वेळ नमूद करून निवडणूक निर्णय अधिकारी आपल्या सूचना फलकावर लावतील.

# प्रकरण-५

# अपील

नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात किंवा नाकारण्यात आल्याबद्दलच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्णयाविरूध्द अपील त्या नगरपालिकेच्या क्षेत्रातील जिल्हा न्यायाधीशाकडे सादर करता येते.

**५.१ अपील दाखल करण्याचा कालावधी:-**

१. वैध रित्या नामनिर्देश केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, त्याविरूध्द जिल्हा न्यायाधीशाकडे अपील दाखल करता येईल.

२. ज्या प्रसंगी अपील दाखल करण्यात आले असेल त्या प्रसंगी उक्त उमेदवाराने अपील दाखल केल्याच्या लगतनंतरच्या दुसऱ्या दिवशीच्या दुपारी ३ वाजेपर्यंत त्याने अपील दाखल केल्यासंबंधीची नोटीस निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास दिली पाहिजे.

५.२ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप२०२५/सं.क्र.१४/का-६, दि.०७/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये जिल्हास्तरीय अभियोक्त यांची नेमणूक करण्यात यावी.

५.३ जिल्हाधिकारी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी तसेच जिल्हा न्यायालय यामध्ये समन्वय साधणेकामी जिल्हा स्तरावर स्वतंत्र सहायक सरकारी अभियोक्ता यांची तात्काळ नेमणूक करण्यासंदर्भात जिल्हा सरकारी अभियोक्त यांना विनंती करावी.

५.४ सदर सरकारी अभियोक्त मार्फत जिल्हा न्यायाधीश यांना राज्य निवडणूक आयोगाने जाहिर केलेल्या नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या कार्यक्रमाबाबत सूचित करावे. या कालावधीत प्राप्त होणाऱ्या अपीलांच्या सुनावणीकरिता विशेष न्यायालय नेमून सर्व अपील एकाच न्यायाधीशाकडे वर्ग करण्याबाबत जिल्हा न्यायाधीशांना विनंती करावी.

५.५ मा.न्यायाधीशांनी प्राप्त अपील शक्य तितक्या लवकर काढण्यासाठी (AGP) मार्फत अथवा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी स्वत: मा. न्यायाधीशांना विनंती करावी.

# प्रकरण-६

## उमेदवारी मागे घेणे

**१ उमेदवारी मागे घेणे संबधीची नोटीस**

१.१ कोणत्याही उमेदवारास-

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमांतर्गत निवडणूक नियम क्र.१३ अन्वये वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर ते राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत त्याने सही केलेल्या व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वाधीन केलेल्या लेखी नोटिशीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल. विहित नमुन्यात ( प्रकरण-१८, नमुना-५ )

१.२ उपरोक्त तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोग, निवडणूक कार्यक्रमात ठरवून देईल, अशा निश्चित केलेल्या कालावधीत मात्र कोणत्याही परिस्थितीत शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजण्यापूर्वी उमेदवारी मागे घेण्यासंबंधिची नोटीस, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात येईल. तद्नंतर प्राप्त नोटिशींना कायदेशीर अर्थ नसून अशा नोटिसा स्विकारण्यात येवू नयेत.

१.३ अशी नोटीस उमेदवार स्वत: किंवा त्याने लेखी प्राधिकृत केलेल्या आपल्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत वा आपल्या सुचकामार्फत देईल.

१.४ उमेदवारी मागे घेण्याच्या नोटिशीच्या खरेपणाबाबत तसेच ती सादर करणाऱ्या व्यक्तीच्या खरेपणाबाबत निवडणूक निर्णय अधिकारी स्वत: खात्री करेल व अशा प्राप्त नोटिशीबाबत रितसर पोच देईल.

१.५ अशी खात्री केलेली नोटीस प्राप्त झाल्यानंतर ती मागे घेण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

**२ उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची यादी :**

विहीत मुदतीत, विहित पद्धतीने खात्री करण्यात आलेल्या सर्व उमेदवारी मागे घेणाऱ्या उमेदवारांची यादी निवडणूक निर्णय अधिकारी विहित नमुन्यात ( प्रकरण-१८, नमुना-६ ) तयार करेल व सूचना फलकावर लावण्याची व्यवस्था करेल.

**३ पर्यायी उमेदवारांच्याबाबतील निर्णय :**

**यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/नप/प्र.क.९/का-६, दि.१४/०५/२०२६ चे आदेश पहावे. या आदेशानुसार खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.**

**अ. नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांकरीता --**

४. जर मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनत्र वैध ठरले व त्याने माघार घेतली नसेल अशा परिस्थीतीमध्ये पक्षाचा मूळ उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार असेल. पर्यायी उमेदवाराने पाच सूचक देऊन वैध नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल केवळ त्याच परिस्थितीमध्ये तो अपक्ष उमेदवार होईल. अन्य परिस्थितीमध्ये पर्यायी उमेदवार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमध्ये येणार नाही.

५. मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये अवैध ठरल्यास अथवा त्याने माघार घेतल्यास जर पर्यायी उमेदवार वैधरित्या नामनिर्देशित असेल (एक सूचक/पाच सूचक) तर तो पक्षाचा मूळ उमेदवार होईल.

**ब. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांकरीता --**

५. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या सर्व उमेदवारांनी (मूळ उमेदवार तसेच पर्यायी उमेदवार दोघांनीही) नामनिर्देशनपत्रामध्ये पाच सूचक नमूद करणे आवश्यक आहे.

६. जेव्हा नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा मूळ उमेदवार वैधरित्या नामनिर्देशित झाला असेल व त्याने माघार घेतली नसेल अशा परिस्थितीमध्ये पक्षाचा मूळ उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार असेल, व पक्षाचा पर्यायी उमेदवार, जर अन्य बाबींची पूर्तता करत असेल (वैधरित्या नामनिर्देशित असेल) व जर त्याने माघार घेतली नसेल तर अपक्ष उमेदवार होईल.

७. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरल्यास अथवा मूळ उमेदवाराने माघार घेतल्यास अन्य बाबीनुसार पात्र ठरत असल्यास (वैधरित्या नामनिर्देशित असेल) पर्यायी उमेदवार त्या पक्षाचा मूळ उमेदवार होईल.

# प्रकरण – ७

## चिन्ह वाटप

## सर्वसाधारण सूचना

राज्य निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्हांचे वाटप आदेश, दि. २० नोव्हेंबर, २००४ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता पक्षांची नोंदणी प्रथम आवश्यक केली. त्यानंतर दि.३१ मार्च २००९ च्या आदेशानुसार याबाबत नव्याने एकत्रित आदेश दिले होते. आता राज्य निवडणूक आयोगाने सदर आदेश अधिक्रमित करुन महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ०५ मे, २०२५ रोजी प्रसिध्द केले आहेत. त्यानुसार जे पक्ष राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करतील, केवळ त्याच पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लढविताना चिन्ह राखून ठेवता येते किंवा प्राधान्याने चिन्ह वाटप करता येते.

२. ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांची यादी राज्य निवडणूक आयोग वेळोवळी प्रसिध्द करते. त्या यादीनुसारच चिन्ह वाटप करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत केवळ भारत निवडणूक आयोगाच्या पक्षांच्या यादीतील नावांच्या आधारे चिन्ह वाटप करण्यात येऊ नये.

३. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र. रानिआ/रापनों-२०२५/प्र.क्र. ५४/का-११, दि. ०८ नोव्हेंबर, २०२५ अन्वये राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेल्या पक्षांची यादी व चिन्हे अधिसूचित केली आहेत. या यादीमध्ये वेळोवळी सुधारणा करण्यात येते. प्रत्येक निवडणुकीच्या वेळी अद्ययावत यादी तसेच मुक्त चिन्हांचा तक्ता, राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त करुन घ्यावा.

४. **निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी :-** उमेदवारी मागे घेतल्यानंतर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमा अंतर्गत निवडणूक नियम क्र. १६ (४) अन्वये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी ( प्रकरण-१८, नमुना-७ ) तयार करणे आवश्यक आहे.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करताना नगरपरिषदा व नगरंचायतींच्या निवडणुकांकरिता उमेदवारांची नावे मतपत्रिकेवर कशाप्रकारे येतील यासंदर्भात नगरविकास विभागाने अधिसुचना दि.०१ एप्रिल, २०२६ अन्वये निवडणूक नियमात सुधारणा केली असून त्यानुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी खालील प्रमाणे करणे आवश्यक आहे:-

> **पहिला गट –** भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेली आहे असे मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष व महाराष्ट्र राज्यातील मान्यतप्राप्त राज्यस्तरीय पक्ष यांचे उमेदवार .

**दुसरा गट** - भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांचे उमेदवार.

**तिसरा गट** -राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांचे उमेदवार .

**चौथा गट** - अपक्ष उमेदवार.

वरीलप्रमाणे प्रत्येक गटातील उमेदवारांचा क्रम लावताना तो मराठी भाषेतील वर्णानुक्रमानुसार लावण्यात यावा. उमेदवारांचा क्रम लावताना प्रथम त्यांचे आडनाव, (आडनाव नसल्यास नाव) व त्यानंतर पत्ता विचारात घ्यावा.

निवडणूक लढविण्याऱ्या उमेदवारांची यादी वरील सुधारित तरतुदीनुसार करण्यात यावी. पर्यायाने मतपत्रिकेवरील उमेदवारांचा क्रम देखील वरील तरतुदीनुसार राहील.

५. **मतपत्रिकेवरील नाव कसे राहिल** :- एखादा उमेदवार आपले नाव मतपत्रिकेवर कशा प्रकारे छापण्यात यावे, याबाबत नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटची तारीख व वेळ यापूर्वी कळवू शकतो. उमेदवाराचे नाव मतपत्रिकेवर त्यानुसार छापण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी निर्णय घेऊ शकतात. मात्र, त्यानुसार नावे छापताना त्याचा मतपत्रिकेवरील अनुक्रम वर नमुद केलेल्या तरतुदीनुसार राहील.

६. **राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ दि. ०५ मे, २०२५ व दि.२३ जानेवारी, २०२६ च्या आदेशान्वये** राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांना चिन्हांचे वाटप कशाप्रकारे करावे याबाबत अधिसूचित केले आहे. या अधिसूचनेच्या **भाग चार** मध्ये नमूद केलेल्या तरतूदींच्या आधारे तसेच दि.२३ जानेवारी, २०२६ ची सुधारणा विचारात घेऊन **निवडणूक चिन्ह वाटप करण्यात यावे. सदर आदेशानुसार चिन्ह वाटपाच्या संदर्भातील तरतुदी थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत:-**

i. उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रामध्ये तो ज्या पक्षाचा उमेदवार म्हणून निवडणूक लढवित आहे त्याचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

ii. संबंधित राजकीय पक्षाने विहित कालावधीमध्ये उमेदवाराचे सुचनापत्र व ते सही करण्यास सक्षम असलेला अधिकारी कोण याबाबतची जोडपत्र-१ व जोडपत्र-२, जिल्हाधिकारी आणि संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी निश्चित केलेल्या वेळेत सादर करणे आवश्यक आहे.

iii राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेले राष्ट्रीय अथवा राज्यस्तरीय पक्ष तसेच इतर पक्ष यांनी उभे केलेले उमेदवार महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ दि. ०५ मे, २०२५ च्या आदेशातील परिच्छेद क्र. २० मधील अटी पूर्ण करीत असल्यास त्यांना त्यानुसार त्या पक्षाकरिता राखीव असलेले चिन्ह वाटप करता येईल किंवा चिन्ह वाटपामध्ये प्राधान्य मिळेल.

iv. बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षाद्वारे उभे करण्यात येणारे उमेदवार तसेच अपक्ष उमेदवार यांना मुक्त चिन्ह वाटप करण्याबाबतची कार्यपध्दती सदर आदेशाच्या परिच्छेद क्र.१५ अन्वये विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार उदा. एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षाच्या "अ" जागेवरील उमेदवारास वाटप झालेले मुक्त चिन्ह त्याच पक्षाच्या त्या प्रभागातील अन्य जागांवरील उमेदवारांना देता येईल. तसेच प्रभागात निवडणूक लढविणाऱ्या सर्व अपक्ष उमेदवारांना वेगवेगळ्या मुक्त चिन्हांचे वाटप होईल, याद्दष्टीने या परिच्छेदात तरतुदी आहेत.

v. राज्य निवडणूक आयोगाकडे जर एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लगतच्या मागील सार्वत्रिक निवडणूकीत किमान ५ टक्के जागा जिंकल्या असतील तर त्या पक्षास उपरोक्त आदेशातील परिच्छेद क्र. १७ मधील तरतूदीनुसार मुक्त चिन्हांपैकी एक मुक्त चिन्ह त्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तात्पुरत्या स्वरुपात आरक्षित करता येईल.

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत अमान्यताप्राप्त असलेल्या इतर पक्षांना मुक्त चिन्हांमधील त्यांनी मागणी केलेले एक मुक्त चिन्ह प्राधान्याने देता येईल. (ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांना राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी न केलेले पक्ष व अपक्ष उमेदवार यांच्यावर प्राधान्याने चिन्ह वाटप करण्यात येते.) याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरावी:-

(अ) जेथे एखाद्या मुक्त चिन्हाची मागणी केवळ एकाच नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवाराने केली असेल तेथे ते चिन्ह त्या उमेदवारास देण्यात येईल.

(ब) जेथे एखाद्या मुक्त चिन्हाची मागणी दोन किंवा अधिक नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी केली असेल त्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून कोणत्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यावयाचे हे ठरवील.

vi. राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी न झालेल्या राजकीय पक्षाच्या उमेदवारांना अपक्ष उमेदवार असल्याचे मानण्यात येईल. या अपक्ष उमेदवार यांना खालीलप्रमाणे मुक्त चिन्ह वाटप करण्यात येईल :-

(अ) जेथे एकापेक्षा जास्त अपक्ष उमेदवारांनी एकाच मुक्त चिन्हाची मागणी केली असेल त्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून कोणत्या अपक्ष उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यावयाचे हे ठरवील.

Vii. अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीबाबत राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/रापनों-२०२५/प्र.क्र.२४/कस.११, दि.२३ जोनवारी, २०२६ अन्वये केलेल्या सुधारणेनुसार चिन्ह वाटप खालील प्रमाणे करावे;

i. यस्थास्थिती अध्यक्षपदासाठी थेट निवडणूक होत असल्यास, सुरवातीला अध्यक्षपदाच्या उमेदवारांना प्राधान्याने चिन्ह वाटप केले जाईल. एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षाच्या अध्यक्षपदाच्या उमेदवारास वाटप केलेले चिन्ह मुक्त चिन्हांपैकी असल्यास आणि तो उमेदवार त्याच नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांकडून सदस्यपदाचीही निवडणूक लढवित असल्यास त्या उमेदवाराने त्याच्या नामनिदेशनपत्रात त्याच मुक्त चिन्हाची मागणी केली असल्यास त्याला त्या मुक्त चिन्हाचे थेट वाटप करावे.

ii. एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाकडून अध्यक्षपदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास वाटप करण्यात आलेले चिन्ह हे मुक्त चिन्हापैकी असल्यास त्या मुक्त चिन्हाचे नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या सदस्यपदांच्या उमेदवारांना त्यांच्या नामनिर्देशनपत्रातील मागणीनुसार परिच्छेद १३ आणि १५(२) (क) मधील तरतुदीनुसार वाटप करण्यात येईल.

iii. तसेच एखादा अपक्ष उमेदवार अध्यक्षपदाच्या निवडणुकीसोबत सदस्यपदाचीही निवडणूक लढवित असल्यास त्या उमेदवारास अध्यक्षपदाकरिता वाटप करण्यात आलेल्या मुक्त चिन्हाचे त्याच्या नामनिर्देशनपत्रातील मागणीनुसार सदस्य पदासाठी देखील थेट वाटप करण्यात येईल; परंतु त्या उमेदवारास वाटप केलेल्या मुक्त चिन्हाचे सदस्य पदाच्या इतर कोणत्याही नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष किंवा अपक्ष उमेदवारास वाटप केले जाणार नाही.

तरी चिन्ह वाटप करताना सर्व सुचनांचा काटेकोरपने अभ्यास करून चिन्ह वाटपाची प्रक्रीया पुर्ण करावी.

**७. पर्यायी उमेदवार :-**

**यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/नप/प्र.क.९/का-६, दि.१४/०५/२०२६ चे आदेश पहावे. या आदेशानुसार खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.**

**अ. नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांकरीता --**

१. जर मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनत्र वैध ठरले व त्याने माघार घेतली नसेल अशा परिस्थीतीमध्ये पक्षाचा मूळ उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार असेल. पर्यायी उमेदवाराने पाच सूचक देऊन वैध नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल केवळ त्याच परिस्थितीमध्ये तो अपक्ष उमेदवार होईल. अन्य परिस्थितीमध्ये पर्यायी उमेदवार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमध्ये येणार नाही.

२. मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये अवैध ठरल्यास अथवा त्याने माघार घेतल्यास जर पर्यायी उमेदवार वैधरित्या नामनिर्देशित असेल (एक सूचक/पाच सूचक) तर तो पक्षाचा मूळ उमेदवार होईल.

**ब. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांकरीता --**

८. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या सर्व उमेदवारांनी (मूळ उमेदवार तसेच पर्यायी उमेदवार दोघांनीही) नामनिर्देशनपत्रामध्ये पाच सूचक नमूद करणे आवश्यक आहे.

९. जेव्हा नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा मूळ उमेदवार वैधरित्या नामनिर्देशित झाला असेल व त्याने माघार घेतली नसेल अशा परिस्थितीमध्ये पक्षाचा मूळ उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार असेल, व पक्षाचा पर्यायी उमेदवार, जर अन्य बाबींची पूर्तता करत असेल (वैधरित्या नामनिर्देशित असेल) व जर त्याने माघार घेतली नसेल तर अपक्ष उमेदवार होईल.

१०. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरल्यास अथवा मूळ उमेदवाराने माघार घेतल्यास अन्य बाबीनुसार पात्र ठरत असल्यास (वैधरित्या नामनिर्देशित असेल) पर्यायी उमेदवार त्या पक्षाचा मूळ उमेदवार होईल.

८. राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांबाबतची सूचना नामनिर्देशनपत्र भरावयाच्या शेवटच्या दिवशी त्यासाठी विहित वेळेपर्यंत किंवा त्यापूर्वी प्राप्त झाली पाहिजे. पक्षाने एकापेक्षा जास्त उमेदवारांना जोडपत्र-२ मधील लेखी सूचनापत्र दिले असल्यास उपरोक्त दि.२३ जानेवारी, २०२६ च्या आदेशातील परिच्छेद क्र. २२ नुसार कार्यवाही करावी. त्यानुसार जर पक्षातर्फे मूळ उमेदवार म्हणून दोघांना विहित नमुने देण्यात आले असतील व त्यापैकी कोणता उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार राहील याबाबत नामनिर्देशनपत्र भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत निश्चित केलेल्या वेळेत पक्षाकडून कोणतेही सूचनापत्र देण्यात आले नसेल तर ज्या उमेदवाराचे नामनिर्देशन प्रथम प्राप्त झाले असेल त्याला पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून गृहीत धरण्यात यावे.

९. चिन्ह वाटपामध्ये चूक झाल्यास व ती संबधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या मतदानापूर्वी लक्षात आल्यास, तो योग्य त्या खुलाशासह आयोगास अहवाल सादर करेल, आयोगाकडून परवानगी प्राप्त झाल्यावर आयोग देईल त्या कार्यक्रमाप्रमाणे चिन्ह वाटप प्रक्रियेपासूनची कार्यवाही पुन्हा करेल.

१०.	चिन्ह वाटपाच्या प्रक्रियेचे छायाचित्रण करावे तसेच सविस्तर इतिवृत्त लिहिण्यात यावे.

११.	निवडणूक निर्णय अधिकारी उमेदवारास वाटून देण्यात आलेल्या चिन्हाबद्दल त्या प्रत्येक उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस माहिती देईल. तसेच चिन्हांचा एक नमुना त्यास पुरविल.

# प्रकरण - ८

## मतदान कर्मचारी वृंद

### १. कायद्यातील तरतुदी :

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम निवडणूक नियमावली, १९६६ च्या नियम क्र. ९ नुसार मतदान केंद्रावर नेमण्यात येणारा कर्मचारीवृंद हा निर्वाचक अधिकारी नेमेल. परंतु असा कर्मचारीवृंद पुरविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक - एसईसी.१०९५/३०६/डेस्क-३ ,दि.०२/०३/१९९५ व शुध्दीपत्रक क्रमांक- एसईसी / झेडपीपीएस / २०१७ / सी.आर.४४ / डी-७, दि.१८/०७/२०१८ नुसार सदरचा कर्मचारीवृंद संबंधित जिल्हाधिकारी अधिग्रहीत करतील.

### २. नियंत्रण :

निवडणूक कामासाठी नेमण्यात येणारे सर्व अधिकारी/कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाच्या अधिक्षण, नियंत्रण व संचालनाखाली काम करतील. निवडणुकीमध्ये काम करताना निष्काळजीपणा वा कसूर करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यास राज्य निवडणूक आयोग सक्षम आहे याची संपूर्ण कल्पना निर्वाचन अधिकाऱ्यांनी प्रशिक्षणामध्ये संबंधीतांना दयावी. (आयोगाच्या आदेश क्रमांक रानिआ५.का/१४.क्र.प्र/२००६-, दि२०-०८-०२.

### ३. सर्वसाधारण सूचना :

भारत निवडणूक आयोगाच्या सर्वसाधारण सूचना व राज्य निवडणूक आयोगाच्या विशेष सूचना लक्षात घ्याव्यात जसे-

- राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक -एसईसी.१०९५/३०६/डेस्क-३ , दि.०२/०३/१९९५ व शुध्दीपत्रक क्रमांक- एसईसी / झेडपीपीएस / २०१७ / सी.आर.४४/ डी-७, दि.१८/०७/२०१८ नुसार राज्य व केंद्र शासनाचे विभाग/कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था वा राज्य शासनाच्या अखत्यारितील महामंडळे / उपक्रम (शासनाचे किमान २५% भांडवलात वाटा असणारे) इ. यामधील अधिकारी / कर्मचारी निवडणूक कामासाठी अधिग्रहित करता येतील.
- कोणत्याही निवडणुकीसाठी अधिकारी/कर्मचारीवृंद अधिग्रहीत करताना आवश्यक कर्मचाऱ्यांची संख्या व कर्मचारी अधिग्रहीत करता येतील अशा उपलब्ध संस्था व त्यामधील उपलब्ध कर्मचारीवृंदांची संख्या लक्षात घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत

एकाच संस्थेचे कर्मचारी नेमण्यात येऊ नयेत. तसेच एखाद्या संस्थेचे सर्वच्या सर्व कर्मचारी / अधिकारी काढून घेऊ नयेत.

- अधिकारी /कर्मचारी नेमताना व त्यांना विविध जबाबदाऱ्या सोपविताना त्यांचे संबंधित संस्थेतील पद, जेष्ठता लक्षात घ्यावी. केवळ वेतनश्रेणी लक्षात घेऊ नये कारण विविध संस्थांमध्ये वेतनबँड वेगवेगळा असू शकतो. कोणत्याही जेष्ठ अधिकाऱ्यास त्याच्यापेक्षा कनिष्ठ अधिकारी/कर्मचाऱ्याच्या हाताखाली काम करावे लागणार नाही याची दक्षता घ्यावी.
- राज्य शासनाच्या विविध महसूल वसूल करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नेमताना त्यांच्या वरिष्ठांची पूर्वपरवानगी असावी जेणेकरून संबंधित विभागाचे अनावश्यक नुकसान होणार नाही.
- आयुर्विमा व बँका यासारख्या यंत्रणेचा कर्मचारी वृंद हा अपवादात्मक परिस्थीतीत नेमला जावा.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना शक्यतोवर नेमण्यात येऊ नयेत. अपवादात्मक परिस्थितीत नेमावयाचे झाल्यास त्यांना मतदान केंद्रांवर मतदान केंद्राध्यक्ष वा पहिला मतदान अधिकारी म्हणून नेमण्यात येऊ नये.
- उमेदवार किंवा उमेदवाराच्या वतीने काम पाहणाऱ्या व्यक्तींची नेमणूक मतदान केंद्राध्यक्ष/ मतदान अधिकारी / मतदान कर्मचारी म्हणून मतदान केंद्रांवर होणार नाही याची दक्षता घ्यावी.
- स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघात कुष्ठरोग्यांसाठी वेगळे वसतिगृह /आश्रम असल्यास व त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदान केंद्र असल्यास त्यामध्ये काम करणारे अधिकारी/इतर कर्मचारी यांना मतदान केंद्राध्यक्ष/अधिकारी म्हणून नेमावे.
- क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५, दि. २६ जून, २०२५ रोजीच्या आदेशान्वये मतदान केंद्रावर पुरवावयाच्या सोयीसुविधाबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**४. कर्मचारीवृंद नेमताना भारत निवडणूक आयोगाच्या निर्वाचक अधिकाऱ्यांसाठी असणाऱ्या मार्गदर्शक पुस्तिकांमधील सुचनांचा देखील विचार करावा जसे -**

अ) अत्यावश्यक सेवांमधील पुढील विभागांना निवडणूक कामांतून सूट देण्यात यावी.

- भारतीय वन सेवा
- पशुवैद्यकिय दवाखान्यातील डॉक्टर / कंपाउंडर
- पशुवैद्यकिय दवाखान्यातील वर्ग-ब चे अधिकारी जसे (Cattle Extension Officer)
- वैद्यकिय क्षेत्रातील डॉक्टर, नर्स वगैरे

- प्रादेशिक वन विभागातील कर्मचारीवृंद
- दूरदर्शन, आकाशवाणी यांचे कर्मचारी
- अन्न महामंडळाचे अधिकारी
- आयुष विभागाचे आयुर्वेदिक, युनानी, होमीओपथी विभागाचे मेडिकल ऑफीसर

ब) BSNL, MTNL चा तांत्रिक विभाग, UPSC व MPSC यांचे कर्मचारी यांना अपवादात्मक परिस्थितीत नेमण्यात यावे.

क) ग्रामीण भागात जेथे एकच बँक असते तेथे अशा बँकेचा कर्मचारी नेमू नये.

ड) ज्या अधिकारी/कर्मचाऱ्याच्या निवृत्तीस ६ महिने वा त्यापेक्षा कमी कालावधी राहिला असेल वा एखादा अधिकारी/कर्मचारी निवृत्त झाला आहे परंतु सेवावाढ मिळाली असेल वा पुन्हा सेवेत घेण्यात आले असेल तर अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यास नेमू नये.

## ५. महिला अधिकारी/कर्मचारी नेमताना घ्यावयाची काळजी:-

- जिथे ज्या मतदान केंद्रावर परदानशीन स्त्री मतदार आहेत किंवा ज्या मतदार संघात स्त्री मतदारांची संख्या सरासरी जास्त असूनही केवळ संकोचामुळे स्त्रिया मतदानास येत नाहीत असे आढळते. त्या मतदान केंद्रावरील मतदान अधिकाऱ्यांच्या पथकामध्ये एकतरी महिला अधिकारी/कर्मचारी असावी. परदानशीन स्त्रियांची ओळख पटविणेकामी अशा महिला कर्मचाऱ्यांचा उपयोग होईल.
- गर्भवती स्त्रिया वा स्तनदा माता (प्रसुती रजेवर नसेल तरी) तसेच ज्यांना आरोग्याच्या दृष्टीने अशा कामापासून दूर ठेवण्याचा सल्ला देण्यात आला असेल अशा स्त्रियांना निवडणुकीचे काम देऊ नये.
- महिला अधिकारी/कर्मचारी यांची राहण्याची व्यवस्था योग्यरित्या करण्यात येईल तसेच त्यांची सुरक्षितता याची काळजी घ्यावी.

## ६. न्यायिक अधिकारी नेमतानाच्या अटी :

- मा. उच्च न्यायालयाच्या परवानगीशिवाय खुद्द व अधिनस्त न्यायालयातील कोणत्याही अधिकाऱ्यांची वा कर्मचाऱ्यांची नेमणूक करू नये.
- दिवाणी न्यायालय, जिल्हा न्यायालयातील न्यायाधीश, अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करू नये.
- कार्यकारी दंडाधिकारी यांना कायदा व सुव्यवस्थेसंबंधी कामे देण्यास हरकत नाही. परंतु त्यांची नेमणूक करताना देखील कार्यकारी दंडाधिकारी यांची कर्तव्ये पार

पाडणेकामी आवश्यक तेवढा पुरेसा अधिकारीवृंद कर्मचारीवृंद वगळून नेमणूक करावी.

## ७. दिव्यांग कर्मचारी नेमताना घ्यावयाची काळजी :

- कोणत्याही दिव्यांग व्यक्तीची मतदान केंद्रावर नेमणूक करणेपूर्वी सदर व्यक्ती मतदान केंद्रावर काम करण्यास सक्षम आहे वा कसे याची खात्री निर्वाचक अधिकारी स्वत: करतील व अशा कर्मचाऱ्यास नेमावयाचे झाल्यास जाण्या-येण्याच्या दृष्टीने सोयीस्कर अशा केंद्रावरच त्यांची नेमणूक करतील.
- निवडणुकीच्या कामाकरीता दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींची नेमणूक करणे आवश्यक असल्यास दिव्यांगांकरीता असलेल्या प्रचलित कायद्यांतर्गत नमुद ज्या पध्दतीच्या कामाकरीता त्याच्या वर्गवारीनुसार संबंधित दिव्यांग कर्मचारी पात्र आहे तत्सम काम त्यास देता येईल.

## ८. पूर्वतयारी : प्रत्यक्ष मतदान केंद्रावर नेमणूक करताना -

आयोगाने क्र. रानिआ/मनपा-२०२३/प्र.क्र.२/का-५, दि.२६.०४.२०२३ अन्वये, निवडणुकांमध्ये अधिकारी/कर्मचारी यांच्या नेमणुका करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर आदेश दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही करावी.

कर्मचारीवृंद अधिग्रहीत करताना त्यांचा ऑफिसचा पत्ता, घरचा पत्ता, मोबाईल नंबर, वेतनश्रेणी, निवृत्तीचा दिनांक या सर्वांची माहिती घ्यावी जेणेकरून मतदान केंद्रासाठी पथक निर्मिती करताना अडचण येणार नाही.

i) एका मतदान केंद्रास १ मतदान केंद्राध्यक्ष, किमान ३ मतदान अधिकारी व १ चतुर्थ श्रेणी कर्मचारी याप्रमाणे मतदान केंद्रांच्या संख्येनुसार (+१०%राखीव) अधिग्रहीत करावयाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करावी. डाटाबेस तयार करताना सर्व संस्थांचा डाटा घ्यावा.

ii) एकाच कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी एकाच मतदान केंद्रावर शक्यतोवर नेमू नयेत.

iii) स्थानिक स्वराज्य संस्थातील रहिवाशी असणाऱ्या कर्मचाऱ्यास त्याचे मतदान ज्या प्रभागात आहे त्या प्रभागातील कोणत्याही मतदान केंद्रावर नेमण्यात येऊ नये.

iv) तसेच मतदान अधिकारी/कर्मचारी नेमताना ते काम करीत असलेली संस्था ज्या प्रभागात येते त्या प्रभागात त्यांची नेमणूक करणे टाळावे. उदा. एखाद्या शिक्षकास तो काम करीत असलेली शाळा ज्या प्रभागात येते त्या प्रभागात नेमण्यात येऊ नये.

v) **पोलीस व्यवस्था :** प्रत्येक मतदान पथकासोबत आवश्यक तो पोलीस बंदोबस्त मतपेटी/ मतदान यंत्र, मतपत्रिका व इतर साहित्य याच्या सुरक्षिततेकरिता सतत असणे

आवश्यक आहे. असे पोलीस कर्मचारी मतदान पथक रवाना होण्याच्या वेळेपासून मतपेटी / मतदान यंत्र सुरक्षा कक्षात (स्ट्राँगरुम) सुपूर्द करण्यात येईपर्यंत मतदान केंद्राध्यक्षाच्या नियंत्रणाखाली व आदेशानुसार काम करतील. सबब, आवश्यक पोलिस बंदोबस्ताबाबत संबंधित यंत्रणेला कळवावे.

vi) प्रशिक्षणाच्यावेळी तसेच EVM तयार करतेवेळी तसेच EVMs जिथे सुरक्षित ठेवण्यात येतील तिथे आवश्यक असणारा पोलीस बंदोबस्ताबाबत संबंधित यंत्रणेला कळवावे.

**९. नेमणूक :**

सर्व मतदान केंद्रावरील अधिकाऱ्यांची नेमणूक ही प्रमाण नमुन्यात करावयाची आहे. नेमणुकीचे आदेश २ प्रतीत करावेत, (ज्यावर निर्वाचन अधिकाऱ्याची सही व शिक्का असेल) जेणेकरून टपाली मतपत्रिकेच्या अर्जासोबत १ प्रत जोडता येईल.

नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना नेमणूक नाकारता येणार नाही.

**११. ओळखपत्र :**

नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना छायाचित्र असणारे खालील प्रमाणे ओळखपत्र देण्यात यावे. परंतु, संबंधित कर्मचाऱ्यांना कोणत्या मतदान केंद्रावर नेमण्यात येणार आहे हे मतदानाच्या आदल्या दिवशी मतदान पथक निर्गमित करण्याच्या दिवशीच कळेल याची काळजी घ्यावी. खालील ओळखपत्राच्या नमुन्यात आवश्यतेनुसार बदल करता येईल.

**-------------नगरपरिषद / नगरपंचायत सार्वत्रिक/पोट निवडणूक - २०....**

| ओळखपत्र |
|---|
| मतदान केंद्राध्यक्षाचे नाव : |
| वय : |
| मूळ कार्यालयाचे नाव : |
| मूळ कार्यालयातील हुद्दा : |
| प्राधिकृत अधिकाऱ्याची सही व शिक्का |

**-------------नगरपरिषद / नगरपंचायत सार्वत्रिक/पोट निवडणूक - २०....**

| ओळखपत्र |
|---|
| मतदान अधिकाऱ्याचे नाव : |
| वय : |
| मूळ कार्यालयाचे नाव : |
| मूळ कार्यालयातील हुद्दा : |
| प्राधिकृत अधिकाऱ्याची सही व शिक्का |

## १२. टपाली मतदान सुविधा :

१२.१ मतदान केंद्रावर नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी हा त्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा रहिवासी असेल तर त्यास टपाली मतपत्रिकेचा अर्ज (PB- १) पहिल्या प्रशिक्षणाच्या वेळी देण्यात यावा व त्याची नोंद विशेष रजिष्टरमध्ये ठेवावी. दुसऱ्या प्रशिक्षणाच्या वेळी संबंधित कर्मचाऱ्यांकडून सदरचे अर्ज गोळा करावेत, सदरचा अर्ज योग्यरित्या भरण्यात आला आहे याची खात्री करून घेण्यात येईल. तसेच संबंधितांचे नाव, मतदार यादी क्रमांक, ओळखीचा छायाचित्र असणारा पुरावा तसेच EPIC तपासून घ्यावा व त्यानुसार त्यांना टपाली मतपत्रिकेचे वाटप करावे. वाटप करण्यात आलेल्या टपाली मतपत्रिकेची नोंद मतदार यादीत घेणे आवश्यक आहे.

१२.२ टपाली मतपत्रिका तात्काळ भरू इच्छिणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी ट्रेनिंग सेंटरवर टपाली मतपत्रिका सुविधा केंद्र (PB Facilitation Centre) ठेवावे. परंतु कोणत्याही परिस्थितीत प्रशिक्षणाकडे दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घ्यावी. सदर मत नोंदविण्यासाठी आवश्यक ती सुरक्षा व गोपनियता राखली जाईल याची देखील दक्षता घ्यावी. तसेच टपाली मतपत्रिकेचे घोषणापत्र (PB-४) प्रमाणित करणेसाठी सक्षम शासकीय अधिकाऱ्याचीही नेमणूक करावी.

## १३. प्रशिक्षण :

राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक- रानिआ/मनपा-२००८/प्र.क्र.९/का-५, दिनांक ११/११/२००८ नुसार ज्यावेळी शाळा-कॉलेज मधील शिक्षकांना ज्यावेळी मतदान केंद्रावरील कर्मचारी म्हणून नेमण्यात येते त्यावेळी जर मतदानाचा दिवस हा सुट्टीचा दिवस नसल्यास त्या दिवशी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात सुट्टी द्यावी, तसेच मतदानाच्या आदल्या दिवशी ज्या दिवशी मतदान साहित्य व मतदान केंद्र ताब्यात घेण्याच्या दिवशी सुद्धा शाळांना सुट्टी द्यावी. शिक्षकांचे व शाळेचे नुकसान होऊ नये म्हणून मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण शक्यतो सुट्टीच्या दिवशी आयोजित करावे. प्रशिक्षणावेळी पुढील गोष्टींची काळजी घ्यावी:

- प्रशिक्षणाच्या तारखा, वेळ व जागा निवडणूक कार्यक्रमाच्या सुरवातीलाच निश्चित कराव्यात.
- किमान ३ प्रशिक्षण द्यावेत, त्यापैकी दुसरे प्रशिक्षण टपाली मतपत्रिका छापल्यावर असेल.
- प्रशिक्षणासाठी आवश्यक मतदान साहित्याचीही व्यवस्था करावी.
- प्रशिक्षणाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, प्राथमिक उपचार साहित्य वगैरेची सोय असावी.

- प्रशिक्षण हे मेळाव्यांसारखे आयोजित न करता छोट्या छोट्या गटात विभागावे व नियम, अधिकार, कर्तव्य याचसोबत EVMs साठी Hands On Training वर भर द्यावा प्रशिक्षणासाठी पुरेशा EVMs उपलब्ध करून घेऊन प्रशिक्षण देण्यासाठी खास कर्मचारीवृंद तयार ठेवावा. प्रशिक्षणार्थीच्या सर्व शंकांचे समाधन होवून त्यांच्यात आत्मविश्वास येईल यासाठी प्रयत्न करावा.
- सांविधानिक- असांविधानिक लिफाफे/ अहवाल याबाबत योग्य ते प्रशिक्षण द्यावे.
- मॉक पोलचे महत्व व बंधन विषद करावे, मॉक पोल केल्याचे प्रमाणपत्र बंधनकारक करावे.
- ज्या ठिकाणी बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एकापेक्षा अधिक मते द्यावयाची असतात त्याठिकाणी मतदान अधिकाऱ्यांना, मतदाराची ओळख पटल्यानंतर चिन्हांकित मतदार यादीत मतदाराच्या नावासमोर खूण करण्याआधी मतदाराला एकूण किती मते द्यावयाची आहेत, याबाबत कल्पना देण्याचे सांगण्यात यावे.
- मतदान केंद्राबाबत ज्या सूचना (दि. २६/०६/२०२५ चे आदेश) तपासून त्यातील गर्भवती महिला, जेष्ठ नागरिक, वा अंध-दिव्यांग मतदार यांची काळजी कशी घ्यावी याबाबत सुचना दयाव्यात. मतदान केंद्रात बसण्याची व्यवस्था, Voting Compartments कुठे असावे याचे व्यवस्थीत प्रशिक्षण दयावे.
- मतदान प्रक्रिया, मतदार यांचे बाबतचे महत्वाचे आदेश संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावेत.
- प्रशिक्षणाच्या हजेरीवर लक्ष ठेवावे, हजेरीपट ठेवावा, गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका दुय्यम लेखून प्रशिक्षणाला कमी महत्व दिले जाते वा ते टाळण्याकडे कल राहतो व त्यामुळे चुका घडतात. तरी राज्य निवडणूक आयोगाच्या दि. ०२/०८/२००६ च्या आदेशाची जाणीव संबंधितांना करून द्यावी.

## १४. मतदान केंद्रांवर पथक पाठविण्याच्या दिवशी प्रशिक्षणाची सोय ठेवणे :

ज्या दिवशी पथके मतदान केंद्रांवर रवाना करण्यात येतील त्या दिवशी देखील Hands On Training ची मध्यवर्ती निवडणूक कार्यालय (Dispatch Centre) वर सोय करावी.

## १५. मानधन :

राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/मनपा-२००८/प्र.क्र.३/का.५, दि. ३१/१/२०१२ व दि.११/२/२०१२ नुसार मतदान / मतमोजणी कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे निवडणूक व आहार भत्याचे दर हे लोकसभा / विधानसभा निवडणूकीसाठी सामान्य प्रशासन विभागाने ठरविलेल्या दरांप्रमाणे असतील. तसेच पोलिस अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठीचे दर हे गृहविभाग ठरवेल. याबाबत कोणतीही थकबाकी राहणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावयाची आहे व तसे प्रमाणित करावयाचे आहे. (आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२६/का.७, दि.९/११/२०१६ चे आदेश) मतदान कर्मचाऱ्यांना शक्यतोवर मतदान केंद्रावरच मानधन देण्याची तयारी ठेवावी.

सन २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी मतदान/मतमोजणी कामासाठी नियुक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या निवडणूक भत्त्याचे शासन निर्णय सुलभ संदर्भासाठी खालीलप्रमाणे आहेत:-

१. सा.प्र.वि. चे शा. नि. क्र. सीईएल-२०२४/प्र.क्र.४५/२४/३३(नि.३)(२), दि. १६.०१.२०२५
२. सा.प्र.वि. चे शा. नि. क्र. बीयुडी-२०२५/प्र.क्र.१४०/२५/का-३३(नि-३), दि. २४.११.२०२५

१६. **मतदान केंद्र पथक :** प्रत्येक मतदान केंद्र पथकात १ मतदान केंद्राध्यक्ष (Presiding Officer), ३ मतदान अधिकारी (Polling Officer) व १ चतुर्थ श्रेणी कर्मचारी व पोलीस असेल.

- प्रत्येक मतदान पथकातील सदस्य स्वत:चा मोबाईल नंबर इतर सदस्यांबरोबर तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्याबरोबर शेअर करेल.
- सर्व पथक पूर्ण झाल्याशिवाय मतदान केंद्रावर रवाना करू नये.

१७. **मतदान केंद्राध्यक्ष (Presiding Officer):**

- मतदान केंद्रात सुव्यवस्था राखणे आणि मतदानाचे काम सुरळीतपणे चालू ठेवणे हे सर्वसाधारण कर्तव्य राहील.
- मतदान केंद्र ताब्यात घेण्यापासून मतदान प्रकिया पार पाडल्यानंतर मतदान पेटी निर्वाचन अधिकाऱ्याच्या ताब्यात देईस्तोवर सर्व जबाबदारी व्यक्तीश: पार पाडेल.
- त्यासाठी तो आपल्या हाताखालील मतदान अधिकाऱ्यांकडे योग्यरित्या कामाचे वाटप करेल.

- अनिवार्य कारणास्तव मतदान केंद्राध्यक्ष अनुपस्थित राहिल्यास पहिला मतदान अधिकारी मतदान केंद्राध्यक्षाची कर्तव्ये पार पाडेल. सबब, पहिला मतदान अधिकारी हा देखील तेवढाच सक्षम नेमावा. याकरीता मतदान पथक निश्चित करतानाच एका मतदान अधिकाऱ्याचे नाव निश्चित करण्यात यावे. शक्यतो प्रथम मतदान अधिकारी / सहायक मतदान केंद्राध्यक्ष (First Poling Officer/Assistant Presiding Officer) या कर्तव्याकरीता नामनिर्देशित करण्यात यावा.
- एखादा मतदान अधिकारी निवडणुकीच्या दिवशी गैरहजर राहिल्यास कोणत्याही सामान्य व्यक्तीची ( उमेदवार वा उमेदवाराच्या वतीने काम न करणाऱ्या) नेमणूक मतदान अधिकारी म्हणून करण्यास मतदान केंद्राध्यक्ष सक्षम राहील.

## १८. मतदान अधिकारी (Polling Officer)

- प्रथम मतदान अधिकाऱ्याकडे चिन्हांकित मतदार यादी असेल, मतदाराची ओळख पटविण्यासाठी हा जबाबदार राहील.
- दुसरा मतदान अधिकारी मतदाराने यापूर्वी मतदान केले नाही याची खात्री करून त्याच्याकडे असणाऱ्या मतदार नोंदवहीत (व्हीएम-१) तो मतदाराच्या ओळखीच्या पुराव्याची नोंद घेईल तसेच सही/ अंगठा घेईल व मतदारास व्होटर स्लिप / मतदान चिठ्ठी देईल. तसेच उक्त मतदान अधिकारी मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीकेस (first finger) राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार न मिटणारी शाई (indelible ink) लावेल.
- तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याकडे मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट असेल. व्होटर स्लिप पाहून तो मतदानासाठी नियंत्रण युनिटचे बटण दाबेल.
- ज्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची उपलब्धता नसल्याने दोनच मतदान अधिकारी असतील तिथे मतदान अधिकारी २ व ३ चे काम एकच व्यक्ती पाहील.

## १९. राखीव कर्मचारी :

मतदान केंद्र पथकातील प्रत्येक श्रेणीतील म्हणजेच मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांच्यातील १०% राखीव कर्मचारीवृंद ठेवावा. त्यांना देखील संपूर्ण प्रशिक्षित करावे. आवश्यकतेनुसार मतदान केंद्रांवर त्यांना वापरता येईल.

## २०. क्षेत्रीय अधिकारी (Zonal Officer) :

मतदान केंद्र निश्चितीनंतर मतदान केंद्रांच्या वाहतूक आरखड्यानुसार एकाच मार्गावर असणाऱ्या केंद्रासाठी एक झोन याप्रमाणे क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे जास्तीत जास्त १० ते १२ केंद्र ठेवावीत. जेणेकरून त्यांना सदर केंद्र तपासणे, मतदान केंद्र पथकांवर नियंत्रण ठेवणे, मतदानाच्या दिवशी अहवाल सादर करणे इत्यादी गोष्टी व्यवस्थित करता येतील.

- क्षेत्रीय अधिकाऱ्याची नेमणूक करताना ज्यास स्थानिक माहिती आहे असा निर्णय क्षमता असणारा अधिकारी असावा.

**२१. प्रत्येक मतदान पथकांची वाहन व्यवस्था :**

मतदान पथक हे मतदान केंद्रावर मतदानाच्या आदल्या दिवशी सायंकाळी पोहचतील अशाप्रकारे निर्गमित करण्यात यावे.

मतदान पथकासोबत मतपत्रिका व मतपेटी / मतदान यंत्र, मतदार यादी इत्यादी साहित्य मतदान केंद्रावर पाठवावयाचे असल्याने योग्य ते वाहन व संरक्षणार्थ पोलीस कर्मचारी पुरविण्यात यावे.

मतदान पथकाचा मध्यवर्ती निवडणूक कार्यालयातून (Dispatch Centre) मतदान केंद्रापर्यंत व मतदान पूर्ण झाल्यानंतर मतदान केंद्रातून मध्यवर्ती निवडणूक कार्यालयापर्यंतचा (Receiving Centre)/मतपेटी जमा करण्याच्या सुरक्षा कक्षापर्यंतचा मार्ग सुनिश्चित असावा व त्याच मार्गाने मतदान पथकाची वाहतूक करण्यात यावी व त्याचा मार्गदर्शक नकाशा निर्वाचन अधिकाऱ्याकडे / तहसिल कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

# प्रकरण – ९

## उमेदवार व  विविध प्रतिनिधी यांना ओळखपत्र देण्याची कार्यपध्दती

### १. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना ओळखपत्र देणे :-

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी तयार झाल्याबरोबर खालील नमुन्यात, उमेदवाराचे छायाचित्र असणारे ओळखपत्र देण्यात यावे. सदर ओळखपत्र हिरव्या रंगाच्या जाड कागदावर छपाई करुन पुरविण्यात यावे.

ओळखपत्र देण्याकरीता उमेदवाराकडून २ फोटो घेण्यात यावेत व खालीलप्रमाणे ओळखपत्र तयार करून, १ फोटो ओळखपत्रावर लावण्यात यावा व सदर ओळखपत्र उमेदवारास देण्यात यावे. तसेच कार्यालयीन अभिलेखासाठी प्रभागनिहाय १ रजिस्टर (वा एका रजिस्टरमध्ये विभाग करून) तयार करून त्यात उमेदवाराचे नाव, पक्षाचे नाव / अपक्ष, हा तपशील नोंदवून त्याच रजिस्टरवर फोटो लावावा व उमेदवाराची ओळखपत्र मिळाल्याची पोहच घ्यावी.

**उमेदवाराचे ओळखपत्र**

----------------नगरपरिषदा/ नगरपंचायत सार्वत्रिक/ पोट निवडणूक २०...

प्रभाग क्र.----------- मधील जागा क्र.--------------

उमेदवाराचे नाव ----------------

उमेदवाराचा फोटो

प्राधिकृत अधिकाऱ्याची सही व शिक्का

# प्रकरण – १०

## आचारसंहिता

## सर्वसाधारण सूचना

१. **मार्गदर्शक तत्वे :**

आचारसंहिता हि मार्गदर्शक तत्वे असून ती निवडणूक प्रक्रिया जास्तीत जास्त आदर्श होण्याकरीता राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहिते संदर्भात वेळोवळी आदेश / निदेश / सूचना जारी केल्या आहेत. त्याचा काळजीपूर्वक अभ्यास करुन आचारसंहितेचा भंग होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

२. **आयोगाचे आदेश :**

राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहितेसंदर्भात, आदेश क्रमांक- रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का-७, दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये सर्वसाधारण सूचना जारी केल्या आहेत. त्याचप्रमाणे यासंदर्भातील इतर महत्वाच्या बाबी **(परिशिष्ट-१ ते ३)** प्रमाणे आहेत, कृपया त्या तपासाव्यात.

३. **आचारसंहितेची व्याप्ती :-** नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या निवडणुकीच्यावेळी आचारसंहिता संपूर्ण नगरपरिषद/ नगरपंचायत क्षेत्रात लागू राहील. पोटनिवडणुकीची आचारसंहिता संबंधित निवडणूक प्रभागापुरतीच लागू असेल. निवडणूक क्षेत्राबाहेरील जिल्ह्यातील निवडणूक नसलेल्या क्षेत्रात नेहमीप्रमाणे सर्व कामे व अनुषंगिक बाबी करण्यावर कोणतेही निर्बंध असणार नाहीत. परंतु नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था वा मंत्री, खासदार, आमदार वा कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही.

४. **आचारसंहितेचा कालावधी :** राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या वेळ व दिनांकांपासून ते निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील.

५. **जाहीर प्रचाराचा कालावधी :**

अधिनियमातील तरतुदी व त्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/ग्रापंनि/-२०२५/प्र.क्र.१७/का.६, दि.२७/११/२०२५ यानुसार जाहीर प्रचाराचा मतदान सुरू होण्याच्या दिनांकास निर्बंध असतील, म्हणजे १० तारखेस मतदान असल्यास ९ तारखेला रात्री १२.०० वाजता प्रचारासोबत जाहिरात प्रसिध्दी/ प्रसारण देखील बंद होईल.

म्हणजेच या कालावधीमध्ये कोणतीही प्रचार सभा घेता येणार नाही. तसेच कोणत्याही दिवशी रात्री १०.०० नंतर ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही तसेच मोर्चे, सभा इ. घेता येणार नाहीत.

जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर उमेदवार मतदान केंद्राच्या १०० मीटर बाहेर मतदारांना भेटून तसेच घरोघरी जाऊन प्रचार करु शकतील. मात्र माईकचा वापर करता येणार नाही आणि समूहाने फिरता येणार नाही.

६. **शासनाच्या जाहिराती :**

आचारसंहितेच्या कालावधीमध्ये शासन खर्चाने कोणत्याही जाहिराती देण्यावर बंदी असल्यामुळे अशा जाहिरातीमधून पक्षांच्या नेत्यांचे फोटो देखील छापण्यावर बंदी आहे. त्यामुळे निवडणूक आचारसंहिता लागू असणाऱ्या क्षेत्रामध्ये असलेले पेट्रोलपंप व इतर ठिकाणी जर केंद्र व राज्य शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये मा. पंतप्रधान, मा. मुख्यमंत्री अथवा अन्य नेत्यांचे फोटो असल्यास, अशा जाहिराती काढून टाकाव्यात अथवा काढून टाकणे शक्य नसल्यास त्या झाकून ठेवण्यात याव्यात. (आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.५/का.५, दि.१६/०१/२०१७)

लोकप्रतिनिधीमार्फत करण्यात आलेल्या विकास कामांच्या नामफलकांना/ जाहिरातींना कलर फासून त्याचे विद्रुपीकरण न करता त्या काढून ठेवणे शक्य नसल्यास त्या झाकून ठेवण्यात याव्यात. (आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा-२०२१/प्र.क्र.१५/का.५, दि. २०/०९/२०२१)

७. **जनमत चाचणी आणि मतदानोत्तर चाचणी** :

जाहीर प्रचार करण्याचा कालावधी संपल्यानंतर मतदान समाप्तीच्या पुढील एक तासापर्यंतच्या कालावधीत जनमत चाचणी आणि मतदानोत्तर चाचणी (Exit Poll) घेणे व त्याचे निष्कर्ष प्रसिध्द करण्यावर बंदी राहील. सदर कालावधीमध्ये वर्तमानपत्रे, नियतकालिके, माहितीपत्रके, फलक किंवा तत्सम प्रसिध्दी, खाजगी किंवा सरकारी रेडीओ, टि.व्ही. केबल, डीटीएच, प्रादेशिक किंवा स्थानिक केबल टि.व्ही., सॅटलाईट, एसएमएस, इंटरनेट, फेसबुक आणि तत्सम उपलब्ध सोशल मिडीया याद्वारे जनमत चाचणी व मतदानोत्तर चाचणी यांचे असे कुठलेही निष्कर्ष प्रसिध्द करता येणार नाहीत. (आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मा वज/२०२५/प्र.क्र.५/का.१०, दि.०९ /१०/२०२५)

८. **नकली (डमी) मतपत्रिका:**

उमेदवारांनी नकली (डमी) मतपत्रिका आपल्या मतदारांना माहिती देण्यासाठी छापण्यास हरकत नाही. तथापि, सदर मतपत्रिकेवर त्यांनी स्वतःचे नाव, अनुक्रमांक आणि चिन्ह, इतकीच माहिती त्यावर छापावी. अन्य कोणत्याही उमेदवाराचे नाव, अनुक्रमांक आणि चिन्ह, नकली मतपत्रिकेवर छापण्यात येऊ नये. दुसऱ्या उमेदवाराचे नाव छापलेली मतपत्रिका आढळून आल्यास त्या जप्त करुन संबंधितांविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी. तसेच ज्या रंगाची मतपत्रिका संबंधित मतदान केंद्रावर वापरण्यात येणार आहे त्याऐवजी दुसऱ्या रंगाची नकली मतपत्रिका छापण्याची परवानगी द्यावी. तसेच सदर मतपत्रिका मतदान केंद्रावर वापरण्यात येणाऱ्या मतपत्रिकेपेक्षा वेगळ्या आकाराची असावी, जेणेकरुन त्यामधील फरक त्वरित लक्षात येईल.

९. **नकली (डमी) बॅलेट युनिट :**

उमेदवार तसेच राजकीय पक्षांनी नकली (डमी) बॅलेट युनिट तयार करुन घेण्यास हरकत नाही. त्याद्वारे मतदारांना त्याची माहिती देणे सुलभ होईल. मात्र, अशी नकली बॅलेट युनिट लाकडी, प्लास्टिक अथवा प्लायवूडची असावीत व ती अधिकृत बॅलेट युनिटच्या अर्ध्या आकाराची असावीत व त्यास अधिकृत बॅलेट युनिटला असलेला रंग वगळून अन्य रंगामध्ये ती तयार करण्याची अनुमती द्यावी.

१०. **अनधिकृत ओळखपत्र चिठ्ठी :**

राजकीय पक्ष तथा उमेदवारांनी मतदारांना मतदान केंद्र तसेच त्यांचा मतदार यादीतील अनुक्रमांक सापडणे सुलभ व्हावे यासाठी अनधिकृत ओळखपत्र चिठ्ठी देण्यास हरकत नाही. त्यावर मतदाराचे नाव, प्रभाग क्रमांक व जागा क्रमांक, मतदान केंद्राचा क्रमांक, मतदाराचा अनुक्रमांक इत्यादी माहिती छापण्यास हरकत नाही. सदरची चिठ्ठी पांढऱ्या कागदावर असावी, मात्र त्यावर कोणत्याही राजकीय पक्ष, उमेदवार अथवा त्याचे निवडणूक चिन्ह तसेच त्यावर कोणतीही घोषणा अथवा कोणत्या उमेदवारास मत देण्याबाबतचे आवाहन छापता कामा नये.

उमेदवाराचे / पक्षाचे निवडणूक चिन्ह यांची छपाई केलेली अशी ओळखचिठ्ठी मतदान केंद्रापासन १०० मीटर अंतराच्या आत कोणतीही व्यक्ती वाटताना आढळून आल्यास सदर व्यक्तीवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

११. **प्रचारासाठी आवश्यक परवानग्या:**

प्रचारासाठी सर्वसाधारणपणे खालील परवानग्या मागितल्या जातात व त्यासाठी खालीलप्रमाणे व्यवस्था करता येईल.

**निवडणुकी दरम्यान लागणारे विविध परवाने**

| अ. क्र. | परवानगीचा तपशील | परवानगी देणारे अधिकारी/ विभाग | परवानगीसाठी करावयाची पूर्तता |
|---|---|---|---|
| १ | चौक सभा व सर्व प्रकारच्या जाहीर सभा | पोलीस विभाग | १. अर्ज<br>२. जागा मालकाचे संमतीपत्र<br>३. स्थानिक स्वराज्य संस्थेचा ना हरकत-दाखला |
| २ | पोस्टर्स/ झेंडे सभेच्या ठिकाणी लावणे | संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था | १. अर्ज<br>२. खाजगी जागा असल्यास मालकाचे संमतीपत्र<br>३. स्थानिक स्वराज्य संस्थेचा ना हरकत-दाखला |
| ३ | खाजगी जागेवर जाहिरात फलक (कटआऊट वगळून) | संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था | १. अर्ज<br>२. खाजगी जागेच्या मालकाचे संमतीपत्र<br>३. फलक लावल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांना देणे आवश्यक आहे. |
| | **प्रचार / वाहन परवानगी** | | |
| ४ | फक्त उमेदवाराच्या मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रापर्यंत | निवडणूक निर्णय अधिकारी | १. अर्ज<br>२. वाहन मालकाचे संमतीपत्र<br>३. वाहन नोंदणीपत्र<br>४. वाहनचालक परवाना |
| ५ | उमेदवाराचे तात्पुरते प्रचार कार्यालय | पोलीस विभाग व निवडणूक निर्णय अधिकारी | १. अर्ज<br>२. जागा मालकाचे संमतीपत्र<br>३. स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत-परवाना |
| ६ | हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरविणे | संचालक, नागरी विमान सेवा | १. अर्ज<br>२. जिल्हाधिकारी/ पोलीस आयुक्त/ पोलीस अधिक्षक नाहरकत<br>३. स्थानिक स्वराज्य संस्थेने आकारलेले शुल्क भरलेची पावती तसेच त्याचा ना-हरकत दाखला<br>४. P.W.D., Fire, Ambulance ची एनओसी |
| ७ | ध्वनिक्षेपकाची परवानगी | पोलीस विभाग | १. अर्ज<br>पोलीस ना-हरकत/ परवानगी |

## निवडणुकीदरम्यान लागणारे विविध परवाने

| अ. क्र. | परवानगीचा तपशील | परवानगी देणारे अधिकारी/ विभाग | परवानगीसाठी करावयाची पूर्तता |
|---|---|---|---|
| ८ | मिरवणूक/ रोड शो | पोलीस विभाग | १. अर्ज<br>२.पोलीस ना-हरकत/ परवानगी |
| ९ | प्रसार माध्यमांद्वारे देण्यात येणाऱ्या जाहीरातींच पूर्वप्रमाणन | प्रसार माध्यम संनियंत्रण समिती<br>१.राज्यस्तरीय समिती - संपूर्ण राज्यात जाहीरात देणे.<br>२.जिल्हास्तरीय समिती - नगरपरिषद/ नगरपंचायत तसेच ग्रामीण स्था.स्व. सं. | राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०९/१०/२०२५ रोजीच्या आदेशातील तरतुदीनुसार विहित नमुन्यात यथास्थिती राज्यस्तरीय/ जिल्हास्तरीय समितीकडे अर्ज करणे आवश्यक. |

१२. **विविध परवानगी देणेकामी एक खिडकी योजना :**

विविध परवानगी देणेकामी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात एक खिडकी योजना राबवावी. (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/ जिपपंस-२०१६/प्र.क्र.३०/का.७, दि.२३/११/२०१६ पहा) यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी करणेकामी संबंधित जिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी योग्य ती उपाययोजना करावी, यासाठी भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४६४/INST/२०१४-EPS, दि. २० मार्च, २०१४ पहावेत. उदा. :-

- परवानगी देणेसंदर्भात पोलीस विभाग तसेच आवश्यक त्या सर्व संबधित विभागांशी संपर्क साधून त्यांच्या प्रतिनिधींची नियुक्ती तात्काळ करून घ्यावी. सदर अधिकारी हा परवानगी कक्षामध्ये त्या विभागाचा प्रतिनिधी असेल व तो सदर विभागाच्या वतीने ना-हरकत दाखला देण्यास जबाबदार असेल. सबब, अशा दर्जाचा सक्षम अधिकारी नेमण्याची विनंती संबधित विभागास करावी.
- आवश्यकतेनुसार वर्ग-३ व ४ चे कर्मचारी देखील नेमावेत.
- एक खिडकी कार्यालयात आवश्यक मुलभूत साधनसामुग्री असावी.
- प्रत्येक उमेदवार / राजकीय पक्ष आवश्यक परवानगीसाठी परवानगी कक्षाकडे किमान ४८ तास आधी अर्ज करतील.
- उमेदवार / राजकीय पक्ष जास्तीत जास्त ७ दिवस आधी (अर्जाचा दिवस वगळून) पुढे आयोजित करावयाच्या मिरवणुका, सभा, इतर कार्यक्रमासाठी अर्ज करू शकतील.

- एकाच दिवशी होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल.
- दोन किंवा अधिक प्रभागांमध्ये विभागल्या गेलेल्या वा समाविष्ट होणाऱ्या जागांवर एखादा कार्यक्रम आयोजित करावयाचा झाल्यास संबंधित परवानगी कक्षाकडे स्वतंत्र अर्ज सादर करावा लागेल.
- परवानगी कक्षाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांची नोंद ठेवणेकामी एक रजिस्टर ठेवावे, ज्यामध्ये प्राप्त अर्ज सर्व विभागांच्या प्रतिनिधींकडे पाठविण्यापासून, अंतिम निर्णय घेवून परवानगी देणे वा नाकारण्यापर्यंतच्या सर्व नोंदी (दिनांक व वेळ) घेण्यात येतील.
- वाहतूक नियंत्रण कक्षाशी संबंधित सर्व परवानगी ह्या परवानगी कक्ष प्रमुख संबंधित विभागाकडून प्राप्त करुन घेईल. अर्जदाराला त्यासाठी वाहतूक विभागाकडे जाण्याची आवश्यकता भासणार नाही.
- या व्यतिरिक्त आवश्यक असणाऱ्या अग्निशामक दल व इतर स्थानिक प्राधिकरणाकडील परवानग्या प्राप्त करुन घेवून कोणत्याही परिस्थितीत अर्ज प्राप्त झाल्यापासून ३६ तासात परवानगी दिली जाईल वा नाकारली जाईल.
- ३६ तासापेक्षा अधिक कालावधीसाठी प्रलंबित असणारे अर्जाबाबत योग्य ती कारणमिमांसा नमूद करुन तसा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला जाईल.

**३६ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी एक खिडकी योजनेमध्ये प्रलंबित असणारे अर्ज**

| अ.क्र. | प्रभाग क्र. व नाव | परवानगी कक्षाच्या प्रमुखाचे नाव व पद | परवानगी कक्षाच्या प्रमुखाचे भ्रमणध्वनी | ३६ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित अर्जांची संख्या | प्रकरणनिहाय प्रलंबित राहण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

- एक खिडकीमध्ये प्राप्त होणाऱ्या अर्जावर प्राप्त होण्याच्या क्रमानुसार (First Come First Served) कारवाई करण्यात येईल.
- एक खिडकीमधून दिल्या जाणाऱ्या प्रत्येक परवानगीची प्रत ही निर्वाचक अधिकाऱ्यांना एक तासाच्या आत दिली जाईल. निर्वाचक अधिकारी सदरची प्रत त्यांच्या आचारसंहिता पथकाला व्हिडीओ शुटिंग वा इतर कार्यवाहीसाठी पाठवतील. या सर्वांची रजिस्टरमध्ये नोंद ठेवली जाईल.
- राजकीय पक्ष वा उमेदवार यांचेकडून शासकीय हेलिपॅड, विमानतळ इ. च्या वापराची परवानगी तसेच जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचेकडे किमान २४ तास अगोदर घेणे आवश्यक राहील. सदर परवानगी घेतेवेळी संपूर्ण प्रवासाचा आराखडा, वेळ, प्रवासी यांच्या नावासह तपशिल देणे आवश्यक राहील.
- सदर एक खिडकी योजनेमध्ये विविध विभागाच्या ना-हरकत परवानगी देण्याकामी खालीलप्रमाणे अधिकारी सहभागी होतील.

(i) पोलीस विभागाचा अधिकारी

(ii) स्थानिक प्राधिकरणाचा अधिकारी,

(iii) अग्निशमक दलाचा अधिकारी

(iv) विद्युत महामंडळाचा अधिकारी

(v) वाहतूक नियंत्रण कक्षाचा अधिकारी

- उपरोक्त अधिकारी हे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या एक खिडकी कार्यालयात उपस्थित राहतील. प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांची छायांकीत प्रत घेऊन त्यावर ना-हरकत देणे/ निर्णय घेणे यासारखी आवश्यक ती कार्यवाही त्याच दिवशी तातडीने करतील. यावेळी देखिल First Come First Served तत्वावर कार्यवाही करण्यात येईल.
- एक खिडकी योजने संदर्भात सर्व उमेदवार / राजकीय पक्ष यांना माहिती द्यावी.

**१३. राजकीय पक्ष अथवा उमेदवारांनी करावयाच्या जाहिरातीवरील निर्बंध :**

(i) राजकीय पक्ष अथवा उमेदवारांनी सादर केलेल्या रेडिओ वा टेलिव्हिजन यासारख्या माधमातून करावयाच्या जाहिरातीची ध्वनीफित / चित्रफीत / सीडी इत्यादी साहित्याची तपासणी करण्यासाठी तसेच त्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या निवडणूकांच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करणेबाबत आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का-१०, दि.०९/१०/२०२५ प्रमाणे कार्यवाही करावी.

(ii) तसेच सदर समितीने छापील प्रसार माध्यमांद्वारे देण्यात येणाऱ्या बातम्यांमध्ये राजकीय पक्ष किंवा उमेदवारांकडून छुपी जाहिरात म्हणजे **"पेड न्यूज"** बाबत आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का-१०, दि.०९/१०/२०२५ प्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

**१४. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी लोकप्रतिनिधींना स्वेच्छा निधीतून (Discretionary Grant) खर्च करण्यावर निर्बंध:**

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ-२०१६/लोस्वेनि/ प्र.क्र.१२/ सं.क., दि. ५ ऑक्टोबर, २०१६ व पत्र क्रमांक रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३१/का-६, दिनांक २०/१२/२०१६ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत संपण्यापूर्वी ३ महिने आधीपासून किंवा निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून यापैकी जे अगोदर घडेल त्या दिनांकापासून त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील कामांवर लोकप्रतिनिधीनी (जसे- खासदार, मंत्री, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, सदस्य इ.) स्वेच्छानिधीतून खर्च

करता येणार नाही. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी काढतील. तरी वरील निर्बंध न पाळल्यास, ते काम मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या उद्देशाने करण्यात आल्याचे गृहित धरुन अशा कामांना स्थगिती देण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी असे निदेश देण्यात आले आहेत.

**१५. उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा :**

१५.१ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा/२०२५/प्र.क्र.४५/का-५, दि. २९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता उमेदवाराने निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादा खालीलप्रमाणे विहीत केली आहे:-

| नगरपरिषद / नगरपंचायत | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | सदस्य संख्या | थेट नगराध्यक्ष | सदस्य |
| १ | अ वर्ग नगर परिषद (न.प.) | १५,००,००० | ५,००,००० |
| २ | ब वर्ग (न.प.) | ११,२५,००० | ३,५०,००० |
| ३ | क वर्ग (न.प.) | ७,५०,००० | २,५०,००० |
| ४ | नगर पंचायत | ६,००,००० | २,२५,००० |

१५.२ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/ संगणकीकरण कक्ष (ब), दि.१५/०२/२०२४ नुसार "निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी (बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवाराने सुध्दा) नामनिर्देशन पत्र दाखल केल्यापासून निकाल राजपत्रात प्रसिध्द होईपर्यंत दैनंदिन जमा व खर्चाचा हिशोबाची नोंद करावयाची आहे तसेच निवडणुकीचा दैनंदिन खर्च ऑनलाईन दररोज भरावयाचा आहे. मात्र निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर संपूर्ण जमा खर्चाचा हिशोब शपथपत्रासह ३० दिवसांच्या आत संबंधित कार्यालयात प्रत्यक्ष सादर करणे बंधनकारक आहे. मात्र नामनिर्देशन पत्र मागे घेणाऱ्या उमेदवारांना खर्चाचा हिशोब सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

निवडणूक खर्चाचा हिशोब सादर न केलेल्या उमेदवारांना अनर्ह ठरविण्याचे अधिकार हे “अ व ब वर्ग” नगरपरिषदांच्या बाबतीत संबंधित विभागीय आयुक्त आणि “क वर्ग नगरपरिषदा तसेच नगरपंचायतींच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

१५.३ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/ संगणकीकरण कक्ष (ब), दि.१५/०२/२०२४ अन्वये उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करण्याची कालमर्यादा व रित विहित केली आहे.

निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने राष्ट्रीयकृत बँक / शेड्युल/ सहकारी बँकेत एक स्वतंत्र खाते (बचत अथवा चालू खाते) उघडून त्या खात्याचा तपशिल नामनिर्देशनपत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांना सादर करावा.

उमेदवाराने निवडणुकीदरम्यान केलेल्या खर्चाबाबत सादर करावयाची विवरणपत्रे व शपथपतत्रे यांचे नमुने देखील सदर आदेशात विहित करण्यात आले आहेत.

ज्या व्यक्तींना झेडप्लस सुरक्षा पुरविण्यात आली आहे अशा व्यक्तींना आचारसंहितेच्या कालावधीत बुलेटप्रुफ वाहनांचा वापर करण्यास परवानगी देण्यात येईल. मात्र बुलेटप्रुफ वाहनांचा वापर अशासकीय कारणांसाठी करण्यात आल्यास सदर वाहन वापरावरील खर्च त्या विशिष्ट व्यक्तीला सोसावा लागेल.

## १६. निवडणूक खर्चाचा हिशोब सादर न केल्यास येणारी अनर्हता :

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १६(१ड) नुसार संबधित निवडणुकांमध्ये उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब राज्य निवडणूक आयोगाने निर्धारीत केलेल्या कालावधीमध्ये आणि आवश्यक केलेल्या रितीने सादर करण्यात कसूर केली तर तो तीन वर्षाच्या कालावधीकरीता निवडणूक लढविण्यास अनर्ह ठरतो.

"अ व ब वर्ग" नगरपरिषदांच्या बाबतीत संबंधित विभागीय आयुक्त आणि "क वर्ग नगरपरिषदा तसेच नगरपंचायती" च्या बाबतीत संबंधित यांना निवडणुकांमधील खर्च सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह ठरविण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. अशी अनर्हता त्यांनी आदेशित केल्यास, कलम १६ (१ई) नुसार, अशी कोणतीही निरर्हता दूर करण्याचे किंवा कमी करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित आहेत. अशा प्रकरणात सक्षम प्राधिकाऱ्याने उमेदवाराला अनर्ह ठरविल्याबाबत पारित केलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या उमेदवाराने विनंती अर्ज करता येईल. (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दि.१५/०२/२०२४).

सबब, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अनर्हतेबाबतच्या उपरोक्त तरतुदींची पूर्वकल्पना निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना दयावी व निवडणूक खर्च सादर करणेबाबतचे विहित हमीपत्र त्यांचेकडून प्राप्त करुन घ्यावे. खर्चाचा हिशोब प्राप्त करून घेणेकामी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी / नगरपरिषदा व नगरपंचायतींने एक स्वतंत्र टिम नेमावी; जेणेकरुन उमेदवारांना आवश्यक बाबी समजावून सांगणे, निवडणूक खर्च वेळीच सादर न केल्यास संबंधीत उमेदवारास आठवण करुन देणेकामी नोटीस काढणे, काही त्रुटी

असल्यास तात्काळ पूर्तता करुन घेणे इ. बाबी वेळोवेळी झाल्याने अनावश्यक विलंब व अडचणी टाळता येतील.

**१७. प्रचार फेरी व मिरवणुकीमध्ये किती वाहने :**

राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/जिपपस-२०१६/प्र.क्र.३१/का.७, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१६ अन्वये प्रचार फेरी व मिरवणुकीमध्ये किती वाहने वापरावीत इत्यादी बाबत आदेश अद्ययावत करण्यात आले आहेत. त्यानुसार नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी जास्तीत जास्त १० वाहनांची परवानगी देण्यात आली आहे. यामध्ये जास्तीत जास्त ३ वाहने चारचाकी वा तीनचाकी असतील व इतर वाहने दुचाकी असू शकतील अशी तरतूद करण्यात आली आहे. तसेच परवानगीशिवाय प्रचारासाठी वाहन वापरावर देखील निर्बंध घालण्यात आले आहेत, तरी सदर बाब तपासावी.

**१८. भारतीय न्याय संहिता २०२३ मधील तरतुदी :**

आदर्श आचारसंहिता जरी केवळ मार्गदर्शक तत्वे असली तरी ज्या वर्तणुकीमुळे निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात निवडणुका पार पडण्यास बाधा निर्माण होईल अशा गोष्टी निवडणूक प्रक्रियेत निषिद्ध राहतील व त्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील खालील कलमांच्या आधारे कारवाई करेल.

| भारतीय न्याय संहिता २०२३ मधील तरतुदी | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कलम** | **कलमाची अनुषंगिक माहिती** |
| १ | कलम १७० | मते मागण्यासाठी लाच देणे या अपराधासाठी एक वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते. |
| २ | कलम १७१ | निवडणुकांमध्ये गैरवाजवी प्रभाव पाडणे. |
| ३ | कलम १७२ | निवडणुकांमध्ये तोतयेगिरी करणे. |
| ४ | कलम १७४ | निवडणुकीत अनुचित प्रभाव पाडल्याबाबत किंवा व्यक्तीरेखेबद्दल |
| ५ | कलम १७५ | निवडणुकीच्या संबंधात खोटे कथन करणे. |
| ६ | कलम १७६ | निवडणुकीच्या संबंधात अवैधपणे पैसे खर्च करणे. |
| ७ | कलम १७७ | निवडणुकीचे हिशेब ठेवण्यास चुकणे. |
| ८ | कलम १७० | मते मागण्यासाठी लाच देणे या अपराधासाठी एक वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते. |

| | | |
|---|---|---|
| ९ | कलम १९७ | राष्ट्रीय एकात्मकतेला बाधा आणणारे वक्तव्य करणे, लिखाण करणे, अथवा कृती करणे यासाठी ५ वर्षासाठी शिक्षा व दंड होऊ शकतो. |
| १० | कलम २१२ | कोणत्याही प्राधिकृत अधिकाऱ्यास खोटी माहिती देणे |
| ११ | कलम २१६ | शपथेवर खोटी माहिती देणे |
| १२ | कलम २२३ | सक्षम अधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास. |

## १९. अन्य कारवाई :

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीत ज्या राजकीय नेत्यांनी भाषणात प्रतिस्पर्धी उमेदवाराबाबत अपशब्द वापरले, जाती अथवा धार्मिक तेढ निर्माण होईल असे वक्तव्य केले इ. बाबत संबंधितांना नोटीस देऊन त्यांच्यावर कारवाई केली असून त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येसुध्दा वरील अनुचित प्रकार घडल्यावर त्याचप्रकारे नोटीस देऊन त्यांच्याविरुध्द कारवाई करावी. (आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा-२०१९/ प्र.क्र.४/का.५, दि.२४/०७/२०१९)

## २०. कायदा व सुव्यस्था :

राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४१/का.७, दि. ०४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याकरीता नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या क्षेत्रात संबंधित जिल्हाधिकारी यांनी यथास्थिती संबंधित पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक यांच्यासमवेत समन्वय साधून उचित कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने विविध मुद्यांबाबत सविस्तर निर्देश दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

# प्रकरण - ११

## अनामत रक्कम जप्त करणे

१. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता उमेदवाराने आपल्या नामनिर्देशनपत्रासोबत खालीलप्रमाणे अनामत रक्कम भरावयाची आहे.

| **उमेदवाराचा प्रवर्ग** | **नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांकरीता अनामत रक्कम** | | |
|---|---|---|---|
| | "अ" | "ब" | "क" व नगरपंचायत |
| सर्वसाधारण* | रु.३०००/- | रु.२०००/- | रु.१०००/- |
| अनुसूचित जाती | रु.१५००/- | रु.१०००/- | रु.५००/- |
| अनुसूचित जमाती | रु.१५००/- | रु.१०००/- | रु.५००/- |
| नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | रु.१५००/- | रु.१०००/- | रु.५००/- |
| सर्व प्रवर्गातील महिला | रु.१५००/- | रु.१०००/- | रु.५००/- |

## २. कायदेशीर तरतूद :

महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती निवडणूक नियम क्र.१४ मधील तरतुदीनुसार नामनिर्देशन पत्रासोबत जमा करण्यात आलेली अनामत रक्कम ही निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आल्यानंतर, उक्त रक्कम ठेवणाऱ्यास किंवा त्याच्या वैध प्रतिनिधीस परत करण्यात आली पाहिजे किंवा नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या खाती जमा करण्यात आली पाहिजे.

## ३. अनामत रक्कम परत करण्यासंदर्भातील अटी :

३.१ महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती निवडणूक नियम क्र.१४ मधील मधील तरतुदीनुसार अनामत रक्कम परत करण्यासंदर्भात कार्यवाही करावी.

३.२ सर्व उमेदवारांना मिळालेल्या वैध मतांच्या एकूण संख्येमध्ये NOTA ला मिळालेल्या मतांचा समावेश होणार नाही याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/ जिपपंस-२०१६/प्र.क्र.१२/का-७, दि.१९/५/२०१६ विचारात घ्यावेत.

## ४. एकापेक्षा अधिक जागांवर निवडून येणे :

४.१ एखादी व्यक्ती एकापेक्षा अधिक जागांसाठी निवडून आली तर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ च्या कलम १९(२) मधील मधील तरतुदीनुसार विहित केलेल्या कालावधीमध्ये आपली पसंती लेखी कळविली पाहिजे. सदर बाबीची पूर्ण कल्पना उमेदवारास द्यावी.

## प्रकरण – १२

## राज्य निवडणूक आयोगाकडे मार्गदर्शन मागण्यात येते असे इतर मुद्दे

१. मतपत्रिका सर्वसाधारणपणे शासकीय मुद्रणालयातून छापून घेण्यात याव्यात. परंतु त्यामध्ये आपणास काही अडचण असल्यास सुरक्षितता, गोपनीयता आणि चिन्हांची योग्य रित्या छपाई करण्याची दक्षता घेऊन खाजगी मुद्रणालयातून छापून घेता येतील. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा २०१४/प्र.क्र.२०/का.०५, दि.१७.११.२०१४

२. उमेदवाराचा पती किंवा पत्नी यांच्या नावावर नगरपरिषद/ नगरपंचायतीचे देणे असल्यास उमेदवार निवडणुकीस अपात्र ठरणार नाही.

३. जर शासकीय, निमशासकीय सरकारी संस्थेच्या इमारती मिळत / उपलब्ध नसल्यास मतदान केंद्रे खाजगी विनाअनुदानित शाळेत करता येते.

४. मतदान केंद्रांची प्रसिध्दी करण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

५. बिनविरोध निवडणूक वगळता अन्य बाबतीत उमेदवारांचा निकाल जाहीर करण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाची परवानगी घेणे आवश्यक नाही. दोन उमेदवारांना समान मते मिळाल्यास सोडत पध्दतीने विजयी उमेदवार घोषित करता येईल.

६. मतदान / मतमोजणी केंद्रावरील कर्मचाऱ्यांना तसेच निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांना भत्ता भारत निवडणूक आयोगाच्या प्रचलित दराप्रमाणे देण्यात यावा. निवडणुकांमध्ये काम करणारे निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच इतर अधिकारी (यामध्ये प्रभाग रचना तसेच मतदार यादी तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांचा समावेश करता येईल.) यांना मानधन/पारिश्रमिक/अतिकालिक भत्ता नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००६/५१२/ प्र.क्र.८९/ २००६/ नवि-२०, दिनांक १६ जुलै, २००७ अनुसार देता येईल.

७. आठवडी बाजाराच्या दिवसासंबंधी आदेश काढण्यासंबंधीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत.

८. मतमोजणी कक्षात बॅलेट युनिट नेणे आवश्यक नाही.

९. मतदानाच्या दिवशी मतदान यंत्रात बिघाड झाल्यास दुसरे मतदान यंत्र बसविण्यासाठी लागणारा कालावधी त्या केंद्रास वाढवून देता येणार नाही. मात्र, संध्याकाळी ५.३० वाजता जे मतदार रांगेत असतील त्या सर्वांना उलट्या क्रमांकाने चिठ्ठ्या वाटून मतदान करु दयावे.

१०. एखादया मतदान केंद्रावर फेरमतदान घ्यावयाचे असल्यास त्यासंबंधीचा प्रस्ताव पत्राने राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवावा. त्या पत्रामध्ये फेरमतदान का घ्यावे लागत आहे याची कारणे नमूद केलेली असावीत.

११. अधिस्विकृतीधारक वृत्तपत्र प्रतिनिधी तसेच इलेक्ट्रॉनिक मिडीया यांचे प्रतिनिधी यांना मतदान केंद्रात प्रवेश देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील. मात्र, मतमोजणीच्या ठिकाणी सुव्यवस्था रहावी व गोंधळ होऊ नये याद्दष्टीने दक्षता घेण्यात यावी.